सी.एच.आर.आय
2015

# 101 गोष्टी ज्या तुम्हाला पोलिसांविषयी जाणून घ्याव्याशा वाटतात परंतु विचारायची खूप भीती वाटते




सी.एच.आर.आय
कॉमनवेल्थ ह्यूमन राईट्स इनिशिएटिव्ह
राष्ट्रकुल देशांमध्ये मानव अधिकार प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्यरत

# कॉमनवेल्थ ह्यूमन राइट्स इनिशिएटिव्ह

कॉमनवेल्थ ह्यूमन राइट्स इनिशिएटिव्ह (सी.एच.आर.आय) ही एक स्वतंत्र, निःपक्ष, आंतरराष्ट्रीय, बिगर सरकारी संघटना आहे. राष्ट्रकुल देशांमध्ये मानव अधिकार प्रत्यक्ष व्यवहारात उतरावेत यासाठीची जबाबदारी या संघटनेवर सोपवण्यात आलेली आहे. अनेक राष्ट्रकुल व्यावसायिक असोसिएशन्सनी/संस्थांनी एकत्र येऊन 1987 साली सी.एच.आर.आय ची स्थापना केली. त्यांचा असा विश्वास होता की कॉमनवेल्थने आपल्या सदस्य देशांना अशी मूल्ये आणि कायदेशीर तत्त्वे दिलेली आहेत. ज्या आधारे ते काम करत आहेत आणि असे एक व्यासपीठ दिलेले आहे जिथून ते मानव अधिकाराच्या प्रसाराचे काम करतात. परंतु कॉमनवेल्थ अंतर्गत मात्र मानव अधिकाराच्या मुद्दयावर फारसे लक्ष देण्यात आलेले नाही.

सी.एच.आर.आय. चा उद्देश कॉमनवेल्थ हरारे सिद्धांत, जागतिक मानव अधिकार जाहीरनामा, त्याचप्रमाणे इतर आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त मानव अधिकाराचे दस्तावेज आणि कॉमनवेल्थ सदस्य देशांमध्ये मानव अधिकारांना पाठिंबा देणाऱ्या देशांतर्गत/दस्तवेजांबाबतीत जागरूकता वाढवणे आणि त्यांची बांधिलकी जपणे हे आहे.

आपले अहवाल आणि नियमित चौकशीयांद्वारे सी.एच.आर.आय कॉमनवेल्थ देशांमधील मानव अधिकाराबाबतची प्रगती आणि अडचणींयांकडे सातत्याने लक्ष वेधत असते. मानव अधिकारांचे उल्लंघन रोखण्याकरिता आवश्यक दृष्टिकोन आणि उपाययोजनांच्या समर्थनासाठी सी.एच.आर.आय. कॉमनवेल्थ सचिवालय, सदस्य सरकारे आणि नागरी समाज संस्था यांचे लक्ष वेधते. आपल्या जन शिक्षण कार्यक्रमांद्वारे, धोरणासंदर्भातील संवाद, तुलनात्मक संशोधन, समर्थन आणि नेटवर्किंगच्या माध्यमातून आपल्या अग्रक्रमाच्या मुद्यांना पुढे आणण्यासाठी प्रेरक म्हणून काम करण्याची भूमिका सी.एच.आर.आयने सातत्याने घेतलेली आहे.

सी.एच.आर.आयच्या प्रायोजक संघटनांचे स्वरूप त्याला एक राष्ट्रीय अस्तित्व आणि आंतरराष्ट्रीय नेटवर्क प्राप्त करून देते. या व्यावसायिक संघटना आपल्या कामामध्ये मानव अधिकाराच्या मापदंडांना सामील करून सार्वजनिक नीती/धोरणाचेही मार्गदर्शन करू शकतात. त्याचप्रमाणे मानव अधिकाराविषयीची माहिती, नियम/मापदंड आणि व्यवहार यांच्या प्रसारामध्ये माध्यम म्हणून काम करतात. हे समूह स्थानिक ज्ञानाला देखील प्रोत्साहन देतात. धोरणकर्त्यांपर्यंत ते पोचू शकतात, महत्त्वाच्या मुद्यांकडे लक्ष वेधतात आणि मानव अधिकारांच्या प्रसारामध्ये महत्त्वाची भूमिका करतात. मानव अधिकारांना चालना देण्यामध्ये सहयोजकांच्या रूपात काम करतात.

सी.एच.आर.आय नवी दिल्लीस्थित संघटना आहे. लंडन, यु.के आणि आक्रा, घाणा येथे संघटनेची कार्यालये आहेत.

**आंतरराष्ट्रीय सल्लागार समिती:** अध्यक्ष – यशपाल घई, सदस्य – सॅम ओकुडझेटो, अलिसन डक्सरी, नेविल लिंटन, वजाहत हबीबुल्ला, विवेक मारु, एडवर्ड मॉरटिमर आणि माजा दारूवाला.

**कार्यकारी समिती (भारत):** अध्यक्ष – वजाहत हबीबुल्ला, सदस्य – बी.के चंद्रशेखर, नीतिन देसाई, संजय हजारिका, कमल कुमार, पूनम मुत्रेजा, रूमा पाल, जेकब पुनोस, ए.पी. शाह आणि माजा दारूवाला – संचालक.

**कार्यकारी समिती (घाणा):** अध्यक्ष – सॅम ओकुडझेटो, सदस्य – अकोटो ॲमपाव, कोफी कॉशिधा, यशपाल घई, वजाहत हबीबुल्ला, नेविल लिंटन, ज्युलिएट टुआकाली आणि माजा दारूवाला

**कार्यकारी समिती (युके):** अध्यक्ष – नेविल लिंटन, सदस्य – रिचर्ड बून, मीनाक्षी धर, क्लेअर डुबे, फ्रांसेस हॉरिसन, डेरेक इंग्रॅम, रिटा पेन, पूर्णा सेन, सैयद शर्फुद्दिन, जो सिलव्हा आणि माईकल स्टोन

कॉमनवेल्थ (राष्ट्रकुल) पत्रकार संघ, राष्ट्रकुल वकील राष्ट्रकुल कायदा शिक्षण संस्था, राष्ट्रकुल संसद संघटना, राष्ट्रकुल प्रेस युनियन आणि राष्ट्रकुल प्रसार भारती संघटना

हा अहवाल प्रकाशित करण्यासाठी युरोपियन युनियनचे अर्थ – साहाय्य लाभले आहे. युरोपियन युनियन २७ सदस्य संघराज्यांची मिळून बनलेली आहे. स्वतःचे ज्ञान, संसाधने आणि प्रारब्ध हळूहळू एकत्र जोडणे हे त्यांचे ध्येय आहे. 50 वर्षांच्या या विस्तृत कालखंडात त्यांनी एकत्रितपणे स्थैर्य, लोकशाही. आणि शाश्वत विकास यांसाठीचा विभाग निर्माण केलेला आहे. हे करत असताना सांस्कृतिक वैविध्य, सहिष्णुता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवलेले आहे. आपल्या यशाचे आणि मूल्यांचे सीमेपलीकडच्या देशांशी, लोकांशी आदानप्रदान करण्यासाठी युरोपियन युनियन बांधील आहे.

या अहवालातील आशयाची संपूर्ण जबाबदारी सीएचआरआयची असून युरोपियन युनियनची भूमिका म्हणून कोणत्याही परिस्थितीत ही ग्राह्य धरता येणार नाही.

**ISBN_81-88205-67-2**
© कॉमनवेल्थ ह्यूमन राईट्स इनिशिएटिव्ह, 2015
स्तोत्रचा योग्य संदर्भ देऊन या अहवालातील माहितीचा वापर करता येईल.

**सी.एच.आर.आय मुख्य कार्यालय**
**नवी दिल्ली**
55–अ, सिध्दार्थ चेंबर 1
कालु सराई, 3रा मजला
न्यू दिल्ली – 110016
भारत
दूरध्वनीः +91–11–4318–0200
फॅक्सः +91–11–2686–4688
info@humanrightsinitiative.org

**सी.एच.आर.आय युनायटेड किंगडम**
**लंडन**
इन्स्टिट्यूट ऑफ कॉमनवेल्थ स्टडीज
28, रसेल स्केअर
लंडन, डब्लूसी 1B5D5
युके
दूरध्वनीः +44–020–7–862–8857
फॅक्सः +44–020–7–862–8820
chri@sas.ac.uk

**सी.एच.आर.आय आफ्रिका**
**आक्रा**
हाऊस नं. 9, समोरा माशेल,
स्ट्रीट असायलम डाऊन
बेवर्ले हिल्स हॉटेल समोर,
ट्रस्ट टॉवर्स जवळ, आक्रा, घाणा
दूरध्वनी : +00233–21–971170
दूरध्वनी/फॅक्स : +00233–21–971170
chriafr@africaonline.com.gh

**www.humanrightsinitiative.org**

# 101 गोष्टी ज्या तुम्हाला पोलिसांविषयी जाणून घ्याव्याशा वाटतात परंतु विचारायची खूप भीती वाटते



लेखक
माजा दारुवाला
नवाज कोतवाल

# प्रस्तावना

दररोज या ना त्या कारणाने आपला पोलीसांशी संपर्क येत असतो. वाहतुकीचे नियंत्रण करताना, अति महत्वाच्या व्यक्तिंना संरक्षण पुरवताना, गर्दीला नियंत्रित करताना, लोकांना न्यायालयापर्यंत घेऊन जाताना, साक्ष देताना, पोलीस चौकीवर तक्रार नोंदवताना, किंवा गुन्हेगारांशी आणि दहशतवाद्यांशी दोन हात करताना, झुंजताना अशी अनेक कामे करताना आपण पोलीसांना पहातो. वर्तमानपत्र, दूरदर्शन यासारख्या माध्यमांतून आणि आपापसातील बोलण्यातूनही पोलीसांबद्दल आपण बरच काही ऐकत असतो. पोलीसांविषयी प्रत्येकाचेच काही एक मत असते आणि बहुतेकवेळा हे मत चांगले नसते पण खरे तर बहुतेक लोकांना पोलीसांविषयी फारच कमी माहिती असते.

लोकशाहीमध्ये हे गणवेशधारी पोलीस लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि त्यांचे दमन करण्यासाठी सत्ताधारी सरकारचे एजंट नसतात तर पोलीस ही एक अग्निशामक दलासारखी किंवा महसुली–सेवांसारखी एक अत्यावश्यक सेवा आहे. ज्यांचे कर्तव्य हे कायद्यानुसार आपल्या सर्वांना संरक्षण देणे हे आहे. इतर सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणे/ प्रशासकांप्रमाणे पोलीस हे जनतेच्या सेवेसाठी नियुक्त केलेले जनसेवक आहेत. त्यांचे वेतन नागरिकांच्या पैशातून दिले जाते.

जसे पोलीसांचे आपल्या प्रति कर्तव्य असते तसेच लोकांचेही पोलिसांच्या प्रति कर्तव्य आहे. एका कर्तव्यदक्ष/जबाबदार नागरिकाचे कर्तव्य हे केवळ पोलीसांना घाबरणे आणि त्यांच्याविषयी नापसंती दर्शवणे किंवा केवळ संकटसमयीच त्यांच्याकडे जाणे हे नाही. तर कायदा–सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आणि जनता यांनी हातात हात घालून, मिळून काम करायला हवे. त्यासाठी त्यांचे काम, त्यातील आव्हाने जाणून घेण्याची गरज आहे. ते काय काम करतात, कशाप्रकारे करतात, पोलीस–दल हे संघटन कसे असते, त्यांची कामे आणि त्यांच्याकडील सत्तेच्या मर्यादा हे सगळे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आपल्याला आपल्या स्वतःच्या हक्कांची आणि कर्तव्यांची जाणीव/माहिती असणेही महत्त्वाचे आहे. कारण तरच कोणीही, पोलीस किंवा नागरिक, कायद्याचे उल्लंघन करून त्यातून सुटून जाणार नाहीत. यालाच कायद्याचे राज्य म्हणता येईल.

ही पुस्तिका पोलीसांविषयी आपल्याला सोप्या–सरळ भाषेत मार्गदर्शन करते. आपल्याला माहिती असते तेव्हाच आपण आत्मविश्वासाने आवाज उठवू शकतो आणि जेव्हा आपण चुकीच्या, अन्याय्य गोष्टीविरुद्ध आवाज उठवू तेव्हाच त्यात बदल घडून येईल. लोकांना पोलीसांविषयीची सर्व प्रकारची माहिती असेल, आणि त्यांना त्यांच्या स्वतःच्या अधिकारांविषयीही जाणीव असेल तर ते त्यांचे सर्व ज्ञान आपल्या सर्वांसाठी आवश्यक अशा आपल्या हक्काच्या चांगल्या पोलीससेवेच्या मागणीसाठी वापरतील.

**संकल्पना, रचना, मांडणी:** चेंथिलकुमार परमशिवं
**रेखाटने:** सुरेश कुमार

## 1. आपल्याला पोलीसदलाची आवश्यकता का आहे?



नागरिकांना सुरक्षिततेची भावना देण्यासाठी पोलीसदल नियुक्त केलेले आहे. समाजामध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे त्याचप्रमाणे गुन्हेगारी रोखण्याचे आणि गुन्ह्यांच्या तपासाचे काम पोलीस करतात. पोलीस दल हे कायद्याची अंमलबजावणी आणि सुव्यवस्ता साठी कार्यरत असले तरी सर्वसाधारण नागरिकाप्रमाणे पोलीस दलाने ही कायद्याचे पालन प्रत्येक टप्प्यावर करणे अपेक्षित आहे.

## 2. पोलीसांची कामे कोणती आहेत?

पोलीसांची अनेक कर्तव्ये आहेत. गुन्हेगारीला रोखणे, व गुन्हे नियंत्रित करणे आणि घडलेल्या गुन्हांचा शोध लावणे, योग्य तपास करणे, न्यायालयात सादर करण्यासाठी फिर्यादीला प्रामाणिक आणि पुराव्यांवर आधारित केस तयार करून देणे. एकंदरीत समाजामध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीसांवर असते. त्यासाठी त्या त्या ठिकाणी, समाजात घडणाऱ्या घटनांविषयीची माहिती ते जमा करत असतात.



रंगे हात पकडले

## 3. पोलीसांचे अधिकार म्हणजे काय?

कायद्याने पोलीसांना अनेक प्रकारचे अधिकार दिले आहेत. कायद्यामध्ये सांगितलेल्या प्रक्रियेनुसारच त्याचा वापर करणे अनिवार्य आहे. पोलीस अटक करू शकतात, शोध घेऊ शकतात, तपासणी करू शकतात, जप्ती आणू शकतात, गुन्ह्यांचा तपास करू शकतात, साक्षीदारांना प्रश्न विचारू शकतात, संशयितांची कसून चौकशी करू शकतात, अनियंत्रित गर्दीला पांगवू शकतात आणि समाजामध्ये सुव्यवस्था आणण्याचे काम करतात. पण हे सर्व ते कायद्यामध्ये सांगितलेल्या प्रक्रियेनुसार, कायद्याने दाखवलेल्या मार्गानुसारच कायद्याच्या चौकटीत राहूनच करू शकतात, अन्य कोणत्याही मार्गाने त्यांना ते करता येणार नाही. पोलीस स्वतःच्या मर्जीप्रमाणे, इच्छेप्रमाणे काम करू शकत नाहीत. सत्तेचा दुरुपयोग, कर्तव्यात कसूर याबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, ती नागरी चूक किंवा गुन्हा समजली जाईल. आणि त्याबद्दल पोलीस अधिकारी शिक्षेस पात्र होईल.



## 4. संपूर्ण भारतात केवळ एकच पोलीसदल आहे का?

नाही. प्रत्येक राज्याचे स्वतःचे एक पोलीसदल असते. त्या त्या राज्य सरकारच्या अखत्यारीत त्याच्या नियंत्रणाखाली ते असते. आपल्या देशात अनेक प्रकारची पोलीस दले आहेत. दिल्ली, चंदीगढ, पाँडेचरी, दमण आणि दीव, लक्षद्वीप, दादरा आणि नगर, हवेली, अंदमान, निकोबार या केंद्रशासित प्रदेशांमधील पोलीस थेट केंद्रसरकारच्या नियंत्रणाखाली आहेत.

## 5. पॅरामिलिटरी सैनिकदल काय आहे?

केंद्रसरकारने विशेष कामासाठी स्थापन केलेली सशस्त्र पोलीस संघटना म्हणजे पॅरामिलिटरी दल. केंद्रीय राखीव पोलीस दल (सी.आर.पी.एफ) सीमा सुरक्षा दल–बी.एस.एफ. भारत तिबेट सीमा पोलीस (आय.टी.बी.पी.) आणि राष्ट्रीय सुरक्षा गार्ड (एन.एस.जी.), त्यांची संरचना सेनेच्या धर्तीवर केलेली असल्याने तिला पॅरॅमिलिटरी सैनिक दल म्हटले जाते. ते पोलीसांना बंडखोरांविरोधी किंवा दहशतवादविरोधी कारवायांमध्ये किंवा नागरी अशांततेच्या काळात पोलीसांना मदत करतात.



## 6. कोणतीही व्यक्ती पोलीस–अधिकारी बनू शकते का?

हो. कोणतीही व्यक्ति पोलीस–अधिकारी बनू शकते. विशिष्ट श्रेणीकरिता तुम्हाला त्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या शर्ती आणि मानदंड पुरे करावे लागतात. उदा. पोलीस हवालदार पदाकरिता तुम्हाला कमीत कमी 10 वी (उच्च माध्यमिक) उत्तीर्ण असणे आवश्यक असते. तर उपनिरीक्षक पदासाठी तुम्हाला पदवीधारक असणे गरजेचे आहे.

## 7. मला पोलीस–अधिकारी कसे बनता येईल?

तीन स्तरांवर तुम्ही पोलीस दलात सामील होऊ शकता. राज्यस्तरावर तुम्ही हवालदार म्हणून कामाला सुरुवात करून पोलीस उपअधीक्षकपदापर्यंत बढती मिळवू शकता. किंवा तुम्ही पोलीस उपनिरीक्षक (सबइन्स्पेक्टर) म्हणून सुरुवात करून जिल्हा पोलीस अधीक्षकपदापर्यंत बढती मिळवू शकता.

हवालदार आणि सबइन्स्पेक्टर पदासाठी प्रथम लेखी परीक्षा द्यावी लागते. त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यास शारीरिक परीक्षा द्यावी लागते. ती उत्तीर्ण झाल्यावर तुम्हाला मुलाखतीसाठी बोलवले जाते. त्यानंतर वैद्यकीय तपासणी होते. तुम्ही वैद्यकीयदृष्टया तंदुरुस्त आहात ना हे पाहिले जाते. आणि त्यानंतरच अंतिम निवड केली जाते.

भारतीय पोलीस सेवा अधिकाऱ्यांची (आय.पी.एस.) भरती केंद्रीय स्तरावर होते आणि त्यांची श्रेणी अतिरीक्त किंवा सहाय्यक अधीक्षक किंवा अधीक्षक (सुपरिटेंडंट ऑफ पोलीस) पासून सुरू होते.

## 8. भारतीय पोलीस सेवा–आय.पी.एस. म्हणजे काय?

भारतीय पोलीस सेवा – आय.पी.एस ही भारत सरकारच्या तीन अखिल भारतीय सेवांपैकी एक सेवा आहे. इतर दोन सेवा आहेत – भारतीय प्रशासकीय सेवा (आय.पी. एस.) आणि भारतीय वन सेवा ( आय.एफ.एस.). या भारतीय पोलीस सेवेच्या समुहातील

पोलीस अधिकाऱ्यांना देशातील कोणत्याही ठिकाणी वरिष्ठ पदावर काम करण्यासाठी पाठवले जाते.

## 9. भारतीय पोलीस सेवेमध्ये (IPS) मला कसे जाता येईल?

त्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन – (यु.पी. एस.सी) संघ लोक सेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्राथमिक परीक्षेला बसावे लागते. परीक्षेची तारीख आणि स्थळ वेळोवेळी स्थानिक आणि राष्ट्रीय वर्तमानपत्रातून प्रकाशित केले जाते.

ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर तुम्हाला मुख्य लेखी परीक्षेला बसता येते. ही मुख्य लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मंडळातील/बोर्डमधील लोकांकडून तुमची मुलाखत घेतली जाते. तुमची निवड झाल्यावर तुम्हाला (विदेश सेवा, प्रशासकीय सेवा, पोलीस, वनसेवा, महसूल इ. पैकी) कोणत्या केंद्रीय सेवेमध्ये दाखल व्हायचे आहे हे विचारले जाते. तुम्ही सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण झाला असाल तर तुम्हाला तुमच्या आवडीचे सेवा क्षेत्र मिळेल; कारण वेगवेगळ्या नागरी सेवांमधली भरती ही गुणवत्तेवर आधारित केली जाते.




## 10. भारतीय पोलीस सेवा (आय.पी.एस.) अधिकारी म्हणून मला कोणते प्रशिक्षण मिळेल?

भारतीय पोलीस सेवेमध्ये तुम्हाला लाल बहादूर शास्त्री प्रशासकीय ॲकॅडमी, मसूरी येथील मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. त्यानंतर राष्ट्रीय पोलीस अकॅडमी, हैदराबाद येथील मूलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

## 11. इतर श्रेणीतील अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना कशा प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते?

राज्यांची स्वतःची प्रशिक्षण विद्यालये आहेत. बिगर भारतीय पोलीस सेवा अधिकारी आणि हवालदार यांचे प्रशिक्षण तिथे होते. त्यानंतर त्यांना वेळोवेळी सेवांतर्गत प्रशिक्षणही दिले जाते. इतर श्रेणीतील कर्मचाऱ्यांना बाह्य शारीरिक प्रशिक्षण, हत्यारांच्या/अस्त्रांच्या वापराचे प्रशिक्षण, प्रथमोपचार, दंगलीना नियंत्रित करण्याचे आणि अस्त्रांविना लढण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे त्यांना वर्गामध्ये विविध फौजदारी कायद्यांविषयीचे प्रशिक्षणही दिले जाते. त्यामध्ये त्याची पद्धती, गुन्ह्याचा तपास कसा करायचा, गर्दी नियंत्रित कशी करायची याविषयी आणि पोलीस सेवेत असताना ज्या प्रश्नांना त्यांना प्रत्यक्ष तोंड द्यावे लागते असे इतर प्रश्न कसे हाताळायचे याचे प्रशिक्षण दिले जाते.

## 12. आपल्या देशात किती पोलीस–स्टेशन्स आहेत?

जानेवारी 2013 पर्यंत देशातील पोलीस–स्टेशन्सची संख्या 14,360 होती. यामध्ये 502 महिला पोलीस–स्टेशन्सचा समावेश आहे.

## 13. आपल्याकडे पुरेसे/पुरेशा संख्येने पोलीस अधिकारी आहेत का?

नाही, संयुक्त राष्ट्राच्या मानदंडानुसार एक लाख लोकसंख्येकरिता 230 पोलीस कर्मचारी असणे आवश्यक आहे. पण भारतात प्रत्येकी एक लाख लोकसंख्येकरिता केवळ 136 पोलीस कर्मचारी आहेत. जगातील सर्वात कमी पोलीस – लोकसंख्या प्रमाणापैकी हे प्रमाण आहे. अनेक रिक्तपदे भरण्यात आलेली नाहीत. पोलीस कर्मचाऱ्यांची मंजूर संख्या 22 लाख आहे. परंतु केवळ 16.6 लाख पोलीसच सेवेत आहेत. याचाच अर्थ 24.8% पोलीस कमी आहेत. पण या आकड्यांमधून पोलीसांविषयीचे संपूर्ण चित्र उभे रहात नाही. कारण मोठ्या शहरांमध्ये छोट्या शहरांच्या, गावांच्या तुलनेत पोलीसांची संख्या जास्त आहे. अनेक पोलीस अधिकाऱ्यांचा उपयोग, काही थोड्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंच्या सुरक्षेसाठी केला जातो. प्रशासकीय आणि वाहतूक नियंत्रणाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी नेमलेले असतात. त्यामुळे गुन्हयांना आळा/प्रतिबंध, गुन्हांचा तपास आणि कायदा–सुव्यवस्था राखण्याच्या कामाकरिता उपलब्ध असणाऱ्या पोलीसांची संख्या फारच कमी होते.

## 14. पोलीसदलामध्ये महिलाही असतात का?

हो. पण एकूण पोलीस–संख्येच्या केवळ पाच टक्के इतकी संख्या महिला पोलीसांची आहे. देशातील सर्व राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात महिला पोलीसांची संख्या सर्वाधिक आहे.


## 15. महिला पोलीस अधिकाऱ्यांची कामे/कर्तव्ये वेगळी असतात का?

नाही. कायदा आणि नियमांच्या चौकटीत बघता जिथपर्यंत कायदा आणि नियमांचा संबंध आहे, तिथे पुरुष पोलीस जी कामे करतात, तीच कामे महिला पोलीसांना करावी लागतात. पण 'सर्व–महिला कर्मचारी पोलीस ठाण्यामध्ये मात्र केवळ महिला पोलीसांचीच नियुक्ती केली जाते.



## 16. पोलीसदलामध्ये काही विशेष आरक्षण किंवा राखीव जागा आहेत का?

हो. प्रत्येक राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांकरिता विशेष आरक्षण आहे. या प्रवर्गातून किती लोकांची भरती करायची यासंबंधीचे केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारांचे स्वतःचे नियम आहेत. तरीही अल्पसंख्याक किंवा महिला यांच्या करिता विशेष आरक्षण नाही. एकूण आयपीएस अधिकाऱ्यांपैकी केवळ 4% अधिकारी मुस्लीम आहेत आणि शिपायांमध्ये साधारण 6% शिपाई मुस्लीम आहेत.[1]



डीजीपी

## 17. पोलीसदलात दलित, स्त्रिया, मुसलमान, ख्रिश्चन, आदिवासी आणि इतरांना सामावून घ्यायची गरज का आहे?

पोलीसदलात पुरुष आणि स्त्रिया त्याचप्रमाणे प्रत्येक धर्म, वर्ग, जाती–जमाती यांचे योग्य प्रतिनिधित्व असायला हवे. दुसऱ्या समाज–समुहांविषयीची समज वाढायला, त्यांचे वर्तन–व्यवहार, दृष्टिकोन, त्यांची संस्कृति याविषयीची समज वाढायला त्याची मदत होते. त्याचप्रमाणे त्यांच्याविषयीचे पूर्वग्रह/दूराग्रह दूर करायलाही मदत होते.



आयजीपी

## 18. एखादी व्यक्ती पोलीस अधिकारी आहे हे मी कसे ओळखू शकेन?

पोलीस अधिकाऱ्यांचा संपूर्ण वेगळा खाकी किंवा निळया रंगाचा गणवेश, टोपी, पट्टा आणि खांद्यावर लावलेला बॅज. हा बॅज त्यांची श्रेणी आणि संबंधित पोलीसदल याविषयी माहिती देतो. पोलीस अधिकाऱ्यांच्या छातीवर नावाची पट्टीही लावलेली असते.



डीवायआयजीपी

## 19. पोलीसदलात कोणकोणत्या श्रेण्या असतात?

सर्वात खालच्या श्रेणीत पोलीस हवालदार असतो. त्याच्या वरच्या श्रेणीत मुख्य हवालदार (हेड – कॉन्स्टेबल – एच.सी.) सहाय्यक उपनिरीक्षक (ए.एस.आय), उपनिरीक्षक (एस.आय.), निरीक्षक (आय.पी.), सहाय्यक/उपअधीक्षक पोलीस (ए.एस.पी./डीवाय.एस.पी.), अतिरीक्त अधीक्षक (ॲडिशनल एस.पी), पोलीस अधीक्षक (एसपी), वरिष्ठ पोलीस अधीक्षक (एस.एस.पी.), पोलीस उप–महानिरीक्षक (डी.आय.जी.), पोलीस महानिरीक्षक (आय.जी.पी), पोलीस सहाय्यक महानिर्देशक (ए.डी.जी) आणि सर्वात वरची श्रेणी अथवा पद म्हणजे पोलीस महानिर्देशक (डी.जी.पी).



एसएसपी

## 20. बीट कॉँस्टेबल म्हणजे काय?

बीट पोलीस हवालदार म्हणजे तुम्हाला मारणारा (Beat) असे नाही. जेंव्हा एखादी व्यक्ती किंवा समुह अटक करून घेण्यास टाळाटाळ करते किंवा पळ काढण्याचा प्रयत्न करते तेंव्हा पोलीसांना बळाचा वापर करण्याची परवानगी असते. बीट कॉंस्टेबलकडे ठराविक मार्ग किंवा ठरवून दिलेले विशेष क्षेत्र असते. जिथे गस्ती घालून सर्व काही व्यवस्थित चालू आहे, कोणतीही संशयास्पद घटना घडणार नाही याचा छडा लावण्याचे काम त्याच्याकडे असते. काही वेळेला इतर पोलीस अधिकारी त्याच्याबरोबर गस्तीला असतात. रात्री गस्त घालताना काही वेळा पोलीस आवाज देतात किंवा काठी आपटतात. त्यामुळे लोकांना कळते की पोलीस गस्त घालत आहेत.

1 सच्चर समिती अहवाल 2006

## 21. सर्व पोलीस अधिकारी सर्व प्रकारची कामे करतात का?

नाही. प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याला हवालदारापासून ते डी.जी.पी पर्यंत प्रत्येकाला वेगवेगळ्या जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत. या जबाबदाऱ्यांची यादी प्रत्येक राज्याच्या पोलीस मॅन्युअल्स्मध्ये (माहिती पुस्तिकेत) दिलेली आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्याला देण्यात आलेली कामे त्याचा कनिष्ठ अधिकारी करू शकत नाही. उदा. पोलीस अधीक्षकाला देण्यात आलेली कामे उपनिरीक्षक करू शकत नाही. परंतु कनिष्ठ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली कामे वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी करू शकतात.

## 22. वाहतूक पोलीस अधिकारी मला वाहतुकीसंबंधीच्या गुन्हयाखेरीज इतर गुन्ह्यांसाठी अटक करू शकतात का?

हो. वाहतूक पोलीस कर्मचारी हा एक पोलीस कर्मचारीच असतो. ज्याला मूलतः वाहतूक नियंत्रणाचे काम दिलेले असते. तुम्हाला एखादा गुन्हा करताना त्याने जर पाहिले तर तो इतर कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्याप्रमाणे किंवा कोणत्याही सामान्य नागरिकाप्रमाणे तुम्हाला अटक करू शकतो.

## 23. सी.आय.डी. म्हणजे काय?

सी.आय.डी 'क्रिमिनल इनव्हेस्टिगेशन डिपार्टमेंट' म्हणजे गुन्हा अन्वेषण विभाग, त्याला काही वेळेला विशेष शाखा किंवा अन्वेषण शाखा म्हटले जाते. ती राज्यपोलीसांची गुन्हे अन्वेषण शाखा आहे. त्यांना घोटाळा, फसवणूक, टोळी–युद्ध आणि आंतरराज्यीय संबंधातील गुन्हेगारी यां सारख्या गंभीर गुन्हयांच्या तपासाचे काम दिले जाते.



## 24. सी.आय.डी. पोलीसांपेक्षा वेगळे आहे का?

नाही. सी.आय.डी कर्मचाऱ्यांची निवड पोलीस अधिकाऱ्यांमधूनच केली जाते.

## 25. पोलीसदलाचा कार्यभार कोणाकडे असतो?

प्रत्येक राज्यात पोलीसविभागाच्या सर्वोच्चपदी एक पोलीस–प्रमुख असतो. त्यांना पोलीस महानिर्देशक (डी.जी.पी) असे म्हणतात. पोलीस महानिर्देशक सरकारला उत्तरदायी असतो. त्यांना आपला अहवाल सरकारला द्यावा लागतो. राज्याच्या किंवा केंद्राच्या गृह विभागाचा गृहमंत्री त्याचा प्रमुख असतो.

## 26 पोलीस प्रमुखाला मंत्र्यालाच रिपोर्ट का करावे लागते?

प्रत्येक नागरिकाला सुरक्षित वाटणे स्वतःच्या आणि प्रियजनांच्या सुरक्षेविषयी, संपत्तीच्या सुरक्षिततेविषयी चिंता न वाटणे, याविषयीचे आश्वासक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. सरकार ही जबाबदारी पोलीसांवर सोपवते. म्हणूनच पोलीसांना ते त्यांची जबाबदारी कशाप्रकारे पार पाडत आहेत याविषयीचा अहवाल सरकारला द्यावा लागतो. ही पोलीसयंत्रणा प्रामाणिक, निःपक्ष, आणि कार्यक्षम आहे आणि मनमानी काम न करता कायद्यानुसार काम करते आहे याची ग्वाही नागरिकांना देणे ही सरकारची जबाबदारी आहे.



## 27. पोलीस–व्यवस्थेसाठी निधी कोण पुरवते?

नागरिकांच्या करामधूनच पोलीसव्यवस्था चालविण्यासाठी लागणाऱ्या पैशांची तरतूद केली जाते. राज्यसरकार व केंद्रसरकारच्या बजेटमधून/निधीमधून पोलीसांचे वेतन दिले जात असले तरी तिथे पैसा येतो तो शेवटी करदात्यांच्या करामधूनच.

## 28. पोलीसांना त्यांच्या कामासाठीचा पैसा कोठून प्राप्त होतो?

प्रत्येक राज्याचे पोलीससेवेसाठी ठेवलेले असे खास अंदाजपत्रक (Budget) असते. त्यातून पोलीसांना निधी पुरवला जातो.

## 29. अंदाजपत्रकाला मंजुरी कोण देते? आणि सर्वाधिक पैसा कशावर खर्च केला जातो?

राज्य विधी मंडळ अंदाजपत्रकाला मंजुरी देते. केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाजपत्रकाला संसद मंजुरी देते. प्रशासकीय विभागाचे महानिर्देशक प्रथम आराखडा तयार करतात. तो मंजुरीकरिता पोलीस महानिर्देशकांकडे पाठवला जातो. तेथून तो गृह विभागाकडे जातो. त्याला अर्थ–मंत्रालयाची मंजुरी मिळाली की तो राज्याच्या अंदाजपत्रकाचा भाग म्हणून मंत्रिमंडळाकडे मंजुरीसाठी पाठवला जातो आणि नंतर तो चर्चेसाठी विधीमंडळाकडे पाठवला जातो. विधीमंडळात चर्चा झाल्यावर पोलीसांसाठीच्या वार्षिक अंदाजपत्रकाला अंतिम मंजुरी मिळते. राज्याच्या अंदाजपत्रकातील

पोलीसव्यवस्थेसाठी देण्यात आलेल्या निधीतील सर्वात मोठा हिस्सा हा वेतनावर/पगारावर खर्च होतो. खर्चाचे अन्य घटक आहेत – प्रशिक्षण, तपास, मूलभूत रचना आणि घरे–निवास.

## 30. पोलीसांना दिला जाणारा पैसा योग्य प्रकारे खर्च केला जातोय याविषयीची माहिती आपल्याला कशी मिळेल?

पोलीसांचे खाते आणि त्यांनी केलेला खर्च याचे वार्षिक लेखापरीक्षण नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) व्दारे केले जाते. हा हिशेब संसदेला आणि राज्य विधीमंडळाला सादर केला जातो. परीक्षण झाल्यानंतर ते गृह विभाग /पोलीसविभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध असतात. किंवा संसदेच्या ग्रंथालयात उपलब्ध असतात. माहिती अधिकार कायद्याचा उपयोग करून तुम्ही वार्षिक पोलीस खर्चाविषयीची माहिती मिळवू शकता. करदात्यांच्या म्हणजे आपल्याच पैशातून पोलीसव्यवस्था चालवली जात असल्याने तो पैसा योग्य प्रकारे खर्च होतोय ना हे आपण पहायला हवे.




## 31. पोलीस कोणत्या कायद्यांनी शासित असतात?

बहुसंख्य राज्यांमध्ये 1861 च्या पोलीस–कायद्याने पोलीस शासित आहेत. काही राज्यांमध्ये त्यांचा स्वतःचा पोलीस–कायदा आहे. पण सर्वच कायदे हे त्या जुन्या कायद्यावर आधारित आहेत.

नुकतीच काही राज्यांनी त्यांच्या कायद्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे आणि नवीन पोलीस–कायदे तयार केलेले आहेत. त्याशिवाय फौजदारी कायदे जसे की फौजदारी / दंड प्रक्रिया संहिता (Criminal Procedure Code) आणि भातीय दंड विधान (Indian Penal Code) द्वारे पोलीसांचे कार्य शासित केले जाते. याखेरीज पोलीसांनी फौजदारी दंड संहितेचे पालन करणेही आवश्यक आहे. तपास करताना पोलीसांनी या कायद्यात सांगितलेल्या सर्व पद्धतींची अंमलबजावणी करायला हवी.

## 32. पोलीस अधिनियमध्ये काय सांगितलेले आहे?

पोलीस अधिनियमात सर्वसाधारणपणे पोलीस काय करू शकतात आणि काय करू शकत नाहीत याविषयी सांगितलेले आहे. पोलीसदल कशाप्रकारे संघटित केले जाईल, पोलीसदलामध्ये श्रेणी कशाप्रकारे असतील, दलाचे पर्यवेक्षण कोण करतील, नियुक्ती कोण करतील, गैरवर्तन केल्याबद्दल पोलीसांना कोणत्या शिक्षेला आणि शिस्तभंगात्मक कारवाईला तोंड द्यावे लागणार या साऱ्या गोष्टी पोलीस अधिनियमात सांगितलेल्या आहेत. सर्वसामान्य लोकांसाठीही काही नियम यात नमूद केले आहेत.

## 33. पोलीस अधिनियमामध्ये लोकांनी केलेले गुन्हे यांचा समावेश का केला आहे?

यात काही गुन्हे यांचा समावेश हे सुनिश्चित करण्यासाठी केलेले आहे की त्यामुळे प्रत्येकजण रस्ते आणि सार्वजनिक जागा स्वच्छ, व्यवस्थित, सुरक्षित आणि आरोग्यदायी ठेवतील. उदा. गुरांना रस्त्यावर मोकळे सोडणे, त्यांची कत्तल करणे किंवा त्यांच्याशी क्रूरपणे वागणे याबद्दल पोलीस त्या व्यक्तिला त्वरित अटक करू शकतात. रस्त्यावर अडथळे निर्माण करणे, रस्ता घाण करणे, परवाना शिवाय रस्त्यावर वस्तू मांडून त्यांची विक्री करणे याबद्दल तसेच अशोभनीय वर्तन करणाऱ्या, दारूच्या नशेत असणाऱ्या किंवा दंगा करणारे यांना ही पोलीस तातडीने अटक करू शकतात किंवा विहिरीसारख्या धोकादायक जागा कुंपण घालून सुरक्षित करण्याकडे दुर्लक्ष करून बेजबाबदार वर्तन करणाऱ्यांनाही पोलीस त्वरित अटक करू शकतात.



## 34. 'कायद्याचे राज्य' याचा अर्थ काय?

कायद्याचे राज्य म्हणजे आपण सर्वानी उच्च, नीच, श्रीमंत किंवा गरीब, स्त्री किंवा पुरुष, सरकारी नोकर आणि लोकसेवक – उदा. पोलीस या सर्वांनी कायद्याचे पालन करणे बंधनकारक रितीने करणे.

आपल्या देशातील राज्यघटने अंतर्गत येणाऱ्या कायद्यानुसारच आपण सर्वांनी राहिले पाहिजे. कोणीही कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही. याचा अर्थ असा की पोलिसांची प्रत्येक कृती ही कायद्यानुसारच व्हायला हवी आणि जर पोलीस तसे करत नसतील तर तेही कायद्याला उत्तरदायी आहेत. याचा अर्थ असाही आहे की जे कायदे बनवले जातील ते योग्य, न्याय देणारे आणि सर्वांना निःपक्षपणे न्यायनिवाडा करणारे असावेत.

## 35. पोलीस अधिकाऱ्याने चूक केली तर त्याला शिक्षा केली जाते का?

हो. कायदा मोडला म्हणून इतर कोणालाही जशी शिक्षा होईल तशीच शिक्षा पोलीस अधिकाऱ्याने कायदा मोडल्यास त्यालाही केली जाते. खरेतर पोलीस ही अशी व्यक्ति आहे जिच्यावर कायद्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवलेली आहे, त्यामुळे तिने कायदा मोडल्यास तिला अधिक कडक शिक्षा व्हायला हवी.



## 36. पोलीस अधिकारी धोकादायक काम करतात. त्यांना विमा संरक्षण दिले जाते का?

हो. पोलीस अधिकाऱ्यांना विमा संरक्षण दिलेले असते. सर्व पोलीस अधिकाऱ्यांना ग्रुप इंश्युरंस – गट विम्यांतर्गत पैसे भरावे लागतात. हे पैसे त्यांच्या पगारातून घेतले जातात. कामावर असताना मृत्यु झाल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्याच्या कुटुंबियांना सानुग्रह रक्कम दिली जाते. (ex-gratia lump sum) पोलीस अधिकारी धोकादायक वातावरणात काम करत असतात. यात अनेक जण मारले जातात किंवा जखमी होतात. आपले कर्तव्य पार पाडत असताना 2008 साली सरासरी 800 पालीस अधिकारी शहीद झाले. गेले दशक तर सर्वात भयंकर होते. त्या दशकात प्रत्येक वर्षी सरासरी 1000 पोलीस अधिकारी शहीद झाले. शहीद झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये सर्वाधिक संख्या पोलीस हवालदारांची होती.

## 37. पोलीस अधिकाऱ्याला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, जिल्हा अधिकारी किंवा मंत्री यांच्यासारख्या सक्षम व्यक्तिंनी दिलेल्या कोणत्याही आज्ञा, आदेश पाळावेच लागतात का?

नाही. कायदेशीर असणारे आदेशच पोलीस अधिकाऱ्याला पाळावे लागतात. चुकीच्या कामाबद्दल त्याला जबाबदार धरले जाते. जरी त्याने ते काम वरिष्ठांच्या हुकमावरून केलेले असले तरी. 'वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून आपण हे चुकीचे आणि बेकायदेशीर काम केले' असे म्हणून तो कधीच स्वतःला निर्दोष ठरवू शकत नाही. यामुळे त्याचा बचाव होऊ शकत नाही.




## 38. पोलीस अधिकारी नेहमीच कामावर – 'डयूटीवर' असतात का?

हो. 1861 च्या पोलीस कायद्यामध्ये हे स्पष्ट केलेले आहे की, पोलीस अधिकाऱ्याला नेहमीच डयुटीवर असल्याचे मानले जाईल. पण याचा अर्थ असा नाही की त्याला कधीच विश्रांती दिली जाणार नाही. याचा अर्थ असा की तो जिथे कुठे असेल, गणवेशात वा गणवेशाशिवाय कायदा–सुव्यवस्था राखण्याचे काम त्याला करावेच लागेल. त्याच्यासमोर एखादा गुन्हा घडत असेल किंवा मदतीसाठी त्याला बोलवण्यात आले तर 'मी आत्ता कामावर नाही' असे तो म्हणू शकत नाही.

## 39. मी माझ्या स्वतःच्या सुरक्षेसाठी/संरक्षणासाठी एखाद्या पोलीस अधिकाऱ्याची सेवा घेऊ शकतो का?

तुमच्या जीविताला जर खरेच गंभीर धोका असेल तर तुम्ही पोलीसांची सेवा घेऊ शकता. काही वेळा राज्य व्यक्तिच्या सुरक्षेची व्यवस्था करते; आणि काही वेळा तुम्हाला त्या सुरक्षा व्यवस्थेचा खर्च करावा लागतो. पोलीस अधिनियमानुसार जर तुम्हाला ठरावीक भागासाठी अतिरिक्त पोलीस तैनात करावे असे वाटत असेल अणि याला जर संबंधित अधिकाऱ्यांची मान्यता असेल तर ठरावीक काळासाठीच्या या अतिरिक्त पोलीस–व्यवस्थेसाठी असणारा खर्च तुम्हाला दयावा लागतो. उदा. मोठ्या लग्नसमारंभासाठी किंवा खाजगी कार्यक्रमासाठी पोलीस तुमच्या भागात, तुमच्या खर्चाने अतिरिक्त पोलीस तैनात करायला सहमती दर्शवू शकतात. पण जर तो भाग गुन्हेगारी प्रवण क्षेत्रात असेल किंवा मोर्चा किंवा सार्वजनिक कार्यक्रम होणार असेल तर अशावेळी अतिरिक्त पोलीस तैनात करण्याची जबाबदारी पोलीसांचीच असते आणि त्यासाठी पैसे भरण्याचा प्रश्नच उदभवत नाही.



## 40. सार्वजनिक परिवहनातून मोफत प्रवास करण्याची किंवा व्यापाऱ्यांकडून मोफत सामान घेण्याची परवानगी पोलीसांना असते का?

काही ठिकाणी पोलीसांना केवळ कामावर असताना सार्वजनिक परिवहनमधून प्रवास करण्यासाठीचे पास दिले जातात. पण अन्यथा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला मोफत प्रवास करण्याची परवानगी नाही. तीच गोष्ट वस्तु/सामान मोफत घेण्याबाबत. केवळ पोलीस अधिकारी आहे म्हणून त्याला दुकानातून वस्तु मोफत घेता येणार नाही. इतर सर्व नागरिकांप्रमाणेच त्यालाही पैसे देऊन वस्तू खरेदी कराव्या लागतात.

## 41. पोलीस अधिकाऱ्यांच्या सर्व आदेशांचे पालन मी करायलाच हवे का?

हो. जर गुन्ह्याशी संबंधित कायदेशीर आदेश असेल तर तो पाळायलाच हवा. खरे तर पोलीस अधिकाऱ्याला त्याच्या कर्तव्यपालनामध्ये मदत करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. विशेषतः पोलीस अधिकारी मारामारी रोखण्याचा प्रयत्न करत असेल किंवा गुन्ह्याला रोखण्याचा किंवा त्याच्या कोठडीमधून पळून जाणाऱ्या एखाद्याला रोखण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला मदत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जर गुन्ह्याशी संबंधित काही माहिती तुमच्यापाशी असेल तर ती माहिती पोलिसांना कळवणे हे तुमचे कर्तव्य आहे. कोणत्याही घोषित गुन्हेगाराला आसरा न देणे हेही तुमचे कर्तव्य आहे. एखाद्या गुन्ह्यासंबंधी तुम्हाला काही माहिती असेल किंवा तुम्ही काही पाहिले असेल तर न्यायालयात त्याविषयीची साक्ष देणे हेही तुमचे कर्तव्य आहे.



## 42. जर पोलीस अधिकारी मला त्याच्याबरोबर एखाद्या ठिकाणी येण्यास सांगत असेल तर मला त्याच्याबरोबर जावेच लागेल का?

नाही. पण जर तो त्याच्या कामाचा भाग म्हणून एखादी कारवाई करायला जात असेल आणि त्यासाठीचा साक्षीदार म्हणून तुम्हाला सोबत येण्यास सांगत असेल, उदा. एखाद्या व्यक्तीला अटक करणे, मालमत्तेवर जप्ती आणणे किंवा गुन्ह्याच्या ठिकाणचा तपास असेल तर तुम्ही आवश्य जायला हवे आणि सहकार्य करायला हवे. पारंपरिकरित्या याला पंच असे म्हटले जाते – अशी व्यक्ती जी न्यायालयात स्वतंत्रपणे साक्ष देते/अशी व्यक्ती जी न्यायालयात त्याने त्यावेळी काय पाहिले हे स्वतंत्रपणे सांगते.

## 43. जर एखादा पोलीस अधिकारी मला पोलीस ठाण्यात बोलवत असेल तर मी जायलाच पाहिजे का?

नाही. पोलीसांना सहकार्य करणे ही चांगली गोष्ट आहे. पण जोवर पोलीस अधिकारी आपल्याला औपचारिकरित्या अटक करत नाही तोवर पोलीस ठाण्यात जाण्याची आवश्यकता नाही. जर एखाद्या गुन्ह्याविषयी त्याला तुम्हाला प्रश्न विचारायचे असतील किंवा काही चौकशी करायची असेल तर त्याने तुम्हाला लिखित स्वरूपात समन्स/नोटिस पाठवणे आवश्यक आहे. समन्स दिल्याशिवाय तो तुम्हाला पोलीस ठाण्यात येण्याची जबरदस्ती करू शकत नाही. याच्याशी संबंधित एखादी स्त्री किंवा 15 वर्षाच्या आतील मूल असेल तर पोलीसांनी त्यांच्या घरी जाऊनच त्यांची चौकशी करायला हवी.



## 44. पोलीस अधिकाऱ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी द्यायलाच हवीत का?

हो. स्पष्टपणे आणि प्रामाणिक उत्तर देणे आणि तुम्हाला माहिती असलेल्या सर्व गोष्टी पोलिसांना सांगणे हे नेहमीच चांगले आहे, पण जर तुम्हाला काही माहिती नसेल तर पोलीस अधिकारी साक्ष देण्याची सक्ती तुमच्यावर करू शकत नाहीत. किंवा तुमच्या तोंडी जबरदस्तीने काही वाक्ये घालू शकत नाहीत. पोलीस–चौकशीच्या वेळी नेहमीच कोणी तरी तुमच्या सोबत असेल याची काळजी घेतलेली चांगली.




## 45. मी संकटात असेन तेव्हा मला मदत करणे हे पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे का?

हो. 1955 साली गृहमंत्रालयाने पोलीसांसाठी आचार–संहितेची एक मार्गदर्शिका तयार केलेली होती. सर्व राज्यांच्या/ केंद्रशासित प्रदेशांच्या आणि केंद्रीय पोलीस संघटनांच्या प्रमुखांना ती पाठवण्यात आली. त्यामध्ये पोलीसांनी व्यक्तिच्या आर्थिक परिस्थितीचा आणि सामाजिक स्थितीचा विचार न करता तिला सर्वप्रकारचे साहाय्य देण्याची अपेक्षा व्यक्त केलेली होती. या आचारसंहितेनुसार कोणत्याही भीतीशिवाय, निःपक्षपातीपणे सर्वांना संरक्षण देणे हे त्यांचे सर्वसाधारण कर्तव्य आहे. यामध्ये लोकांचे हित डोळ्यासमोर ठेवणे, लोकांविषयी सहृदयता आणि सहानुभूति असणे आणि व्यक्तिगत सेवा आणि मैत्रीचा हात पुढे करणे याचा समावेश आहे.

## 46. कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी मी पोलीसांची मदत घेऊ शकतो का?

समस्या कोणत्या स्वरूपाची आहे यावर ते अवलंबून आहे. ती गुन्हेगारी स्वरूपाची असेल उदा. कुटुंबातील हिंसा, मुलाला किंवा स्त्रीला होणारी जबरदस्त मारहाण, परिचितांकडून झालेला बाल लैंगिक अत्याचार, किंवा घरात अनधिकृतरित्या घुसणे यासारख्या घटनांमध्ये पोलीसांनी तुम्हाला मदत करायलाच हवी. हा तुमचा 'खाजगी' मामला आहे असे म्हणून पोलीस आपली जबाबदारी झटकू शकत नाहीत.

पण समजा घरच्यांचा विरोध आहे, तरीही लग्न करायचे आहे म्हणून सज्ञान मुले पळून गेली असतील तर अशा सज्ञान मुलांचा पाठलाग करून त्यांना जबरदस्तीने पकडून घरी आणणे हे काही पोलीसांचे काम नाही. हा पूर्णपणे कौटुंबिक मामला आहे.

## 47. जर पोलीस अधिकाऱ्यांनी मदत केली नाही किंवा आसपास पोलीस अधिकारी नसेल तर लोक चोराला किंवा गैरवर्तन करणाऱ्याला पकडू शकतात का आणि त्याला तिथेच शिक्षा देऊ शकतात का?

हो आणि नाहीही. ज्याला 'नागरिक–अटक' म्हणतात त्यामध्ये तुम्ही चोराला पकडू शकता आणि जवळच्या पोलीस ठाण्यात त्याला घेऊन जाऊ शकता. तुम्ही केवळ इतकेच करू शकता. पण तुम्ही त्याला मारहाण करू शकत नाही किंवा मारहाण करणाऱ्यांच्या गर्दीत सहभागी होऊ शकत नाही. नागरिकांना केवळ स्वतःचे संरक्षण करण्यासाठी जी कृती आवश्यक असेल ती करण्याचा अधिकार आहे. याला

'स्वरक्षणाचा अधिकार' म्हणतात. पण त्याचाही वापर योग्यप्रकारेच व्हायला हवा. त्याचे रूपांतर एकतर्फी मारहाणीमध्ये किंवा अत्यंतिक अपमानास्पद वागणुकीमध्ये होता कामा नये. आणि एखादा पोलीस अधिकारी जर असे करायला परवानगी देत असेल किंवा त्यात प्रत्यक्ष सहभागी असेल तर त्याच्या विरुद्ध शिस्तभंगात्मक कारवाई होऊ शकते किंवा फौजदारी गुन्हयाचे कलम लावले जाऊ शकते.

## 48. पोलीस अधिकारी मला मदत करत नसेल तर मी काय करू शकतो?

कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला जाणूनबुजून कर्तव्याचा भंग केल्याबद्दल किंवा दुर्लक्ष केल्याबद्दल कैदेची शिक्षा होऊ शकते. पोलीस अधिकारी मदत करत नसेल आणि तुम्हाला हानी पोहचली असेल तर तुम्ही त्याच्याविषयी त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार करू शकता. अशा घटनेत कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्याला दोषी ठरवले जाऊ शकते.

## 49. पोलीस त्यांच्या इच्छेप्रमाणे काहीही करू शकतात का?




नाहीं. अजिबात नाही. जे कायदेशीर आहे तेवढेच ते करू शकतात. खरे तर पोलीस अनेक नियमांना बांधलेले असतात.

यामध्ये त्यांच्या स्वतःच्या विभागाचे नियम, फौजदारी संहितेतील प्रक्रिया नियमावली, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि मानव अधिकार आयोगाच्या मार्गदर्शिका यांचा समावेश आहे.

## 50. पण समजा पोलीस अधिकारी त्याचे पालन करत नसतील तर?

तर घटनेच्या गांभीर्यानुसार तुम्ही त्यांच्या वरिष्ठांकडे किंवा मॅजिस्ट्रेटकडे त्यांची तक्रार करू शकता. लिखित स्वरूपात तक्रार करणे आणि दिलेल्या तक्रारीची पोच घेणे केव्हाही चांगले.

## 51. मी कशा प्रकारची तक्रार करू शकतो?

पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही गैरकामाविषयी तुम्ही तक्रार करू शकता. कारण तो एक लोकसेवक आहे आणि सर्वकाळ तो त्याच्या कर्तव्याशी बांधलेला आहे. तो त्याच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही किंवा विलंब करू शकत नाही.

## 52. पोलीस अधिकारी उद्दाम असेल आणि माझा अपमान करत असेल तर?

पुन्हा, हा मामला कर्तव्यभंगाचा आणि शिस्तभंगाचा असेल तर तुम्ही त्याची तक्रार त्याच्या वरिष्ठांकडे करू शकता. पण मामला जर त्यापेक्षा गंभीर असेल तर, गुन्हेगारी स्वरूपाचा असेल तर तुम्ही त्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवू शकता किंवा थेट स्थानिक न्याय दंडाधिकारी (मॅजिस्ट्रेट) कडे जाऊन तक्रार नोंदवू शकता.

## 53. जरी मी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली तरी आपल्याच अधिकाऱ्याविरुद्ध काही कार्यवाही करायला ते नकार देऊ शकतात का?

हो. असे नेहमीच घडते. पण बाब इथेच संपत नाही. पोलीसांचे उद्दाम वागणे किंवा कर्तव्याकडे दुर्लक्ष करणे किंवा पोलीसी सत्तेचा दुरूपयोग करणे याबद्दलची तक्रार पोलीस प्रमुखाकडे करू शकता किंवा हा मामला फौजदारी गुन्ह्याच्या स्वरूपाचा असेल तर तुम्ही जवळच्या मॅजिस्ट्रेटकडे तक्रार दाखल करू शकता.

## 54. परंतु संबंधित प्रकरण (तक्रार) न्यायालयात घेऊन जाणे खूप कठीण आणि वेळखाऊ आहे का?

पोलीसांच्या विरुद्ध तक्रार नोंदवण्याच्या प्रक्रियेला सरळ, सोपे आणि जलद बनवण्यासाठी काही राज्यांनी पोलीस तक्रार प्राधिकरण स्थापन केलेले आहे. पोलीसांविरुद्ध लोकांच्या तक्रारींची दखल घेण्याचे काम हा विशेष विभाग करतो. या शिवाय ज्या व्यक्तिला पोलीसांविरुद्ध तक्रार करायची आहे ती व्यक्ती आपली तक्रार राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या इतर आयोगांकडेही करू शकते. यामध्ये राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि राज्य मानव अधिकार आयोग, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, आणि राज्य महिला आयोग आणि बाल आयोग यांचा समावेश आहे. भ्रष्टाचारासंबंधित केंद्रीय तपास विभाग, राष्ट्रीय दक्षता आयोग, लोक आयुक्त आणि राज्य दक्षता विभाग आहेत. हे आयोग तुमच्या तक्रारीमध्ये लक्ष घालतील, चौकशी करतील आणि त्यांच्या शक्तीनुसार पोलीसांविरूद्ध एफ.आय.आर. दाखल करण्याची सूचनाही करू शकतील किंवा पीडित व्यक्तीला भरपाई देण्याचा आदेश देखील पोलीसांना देतील.

## 55. एखाद्या गुन्ह्याविषयी मला जर पोलीसांना सांगायचे असेल तर मी काय करायला हवे?

जर तो गुन्हा चोरी, घरफोडी, छेडछाड, हल्ला, बाल लैंगिक छळ, बलात्कार, अपहरण, मानवी व्यापार, दंगा यासारखा गंभीर गुन्हा असेल तर आपण थेट स्थानिक पोलीस ठाण्याच्या प्रमुखाकडे एफआयआर दाखल करू शकता. त्यांनी तो लिखित स्वरूपात दाखल करून घेणे आणि त्याची एकप्रत आपल्याला देणे बंधनकारक आहे.

## 56. एफ.आय.आर. म्हणजे काय?

FIR या संक्षिप्त शब्दाचा अर्थ फस्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट–(प्राथमिक माहिती अहवाल) असा आहे. पीडित व्यक्ती, साक्षीदार, किंवा या दखलपात्र गुन्ह्याविषयी माहिती असलेली कोणतीही इतर व्यक्ती एफआयआर दाखल करू शकते. एफ.आय.आर. मध्ये तुम्ही जे सांगितलेले असते, त्याआधारे पोलीस चौकशीला सुरुवात करतात. त्यासंबंधीचे सत्य/तथ्य गोळा करतात. त्यामुळे गुन्ह्यांची केस उभी राहिली तर त्या आधारे कारवाई होऊ शकते.

## 57. एफ.आय.आर. दाखल करण्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्यात जाणेच आवश्यक असते की कोणत्याही पोलीस ठाण्यात मी एफआयआर दाखल करू शकतो?

तुम्ही कोणत्याही पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. दाखल करू शकता. परंतु गुन्हा ज्या






भागात घडलेला आहे ते ठिकाण ज्या पोलीस ठाण्याअंतर्गत येते त्या पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करणे केव्हाही चांगले. कारण ते त्वरित कारवाई करू शकतात. जेव्हा तुम्ही इतर कोणत्याही पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करता तेव्हा तो स्वीकारणे आणि संबंधित पोलीस ठाण्याकडे तो पाठवणे त्या पोलीस ठाण्याला बंधनकारक असते. गुन्हा त्यांच्या कार्यक्षेत्रात घडलेला नाही या सबबीखाली ते तुमचा एफआयआर दाखल करून घेण्यास नकार देऊ शकत नाहीत.

## 58. पोलीस माझी तक्रार दाखल करून घ्यायला नकार देऊ शकतात का?

हो आणि नाही. भारतात गुन्हे दोन प्रकारचे मानले जातात. दखलपात्र आणि अदखलपात्र. दखलपात्र गुन्हे म्हणजे खून, बलात्कार, दंगली, दरोडे यासारखे गुन्हे. या गुन्ह्यांची नोंद पोलीस थेट प्रत्यक्ष घेऊ शकतात. एफआयआर दाखल करू शकतात आणि चौकशीला सुरुवात करू शकतात. तर अदखलपात्र गुन्हे म्हणजे फसवणूक, घोटाळा, दोन विवाह, अफरातफर, अन्नातील भेसळ, वजनमापात फसवणूक, सार्वजनिक अशांतता निर्माण करणे इ. याचा अर्थ मॅजिस्ट्रेटने तक्रारीची नोंद केली आणि पोलीसांना चौकशीचे आदेश दिले की नंतरच तपास सुरू केला जातो. गुन्ह्यांच्या दोन प्रकारातला फरक हा आहे की ज्या गुन्ह्यांना तातडीने प्रतिक्रिया देणे आवश्यक असते ते गुन्हे थेट पोलीसांकडे दाखल केले जातात आणि इतर प्रकारचे गुन्हे मॅजिस्ट्रेटकडे दाखल केले जातात. म्हणूनच पोलीसांनी तुमची तक्रार दाखल करून घेतली नाही तरी कमीत कमी त्यांनी ती ऐकून घेतली पाहिजे आणि आपल्या रोजच्या वहीत/दैनंदिनीत त्याची नोंद करायला हवी, त्याची एक प्रत सहीनिशी तुम्हाला निःशुल्क द्यायला हवी आणि तुम्हाला तुमची तक्रार घेऊन मॅजिस्ट्रेटकडे पाठवायला हवे.

## 59. समजा माझी तक्रार 'दखलपात्र' गुन्हयाविषयी आहे आणि पोलीस ठाण्याचा अधिकारी तिची नोंद करून घ्यायला नकार देत असतील तर मी काय करायला हवे?

तुम्ही वरिष्ठ अधिकारी/जिल्हा पोलीस प्रमुख किंवा जवळच्या न्यायिक मॅजिस्ट्रेटकडे ती तक्रार घेऊन जाऊ शकता. आणि ती दाखल करून घेण्याचा आदेश ते देतील. तुमच्या तक्रारीची दखल निश्चितपणे घेतली जावी आणि त्यावर कारवाई व्हावी यासाठी तुम्ही तक्रार स्वहस्ते द्या किंवा पोस्टाने पाठवायची असेल तर रजिस्टर एडीने पाठवा. नविसरता त्याची पोच पावती घ्या. म्हणजे आपण केलेल्या तक्रारीचा पुरावा आपल्याकडे राहिल. ती जपून ठेवा. आणि ते संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार पोहोचली हे दाखवेल, हे झाल तुमच्या तक्रारीबद्दल. परंतु तक्रार दाखल करण्यामध्ये तुम्हाला कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागले यासंबंधीची तक्रारही तुम्ही करायला हवी त्यामुळे तो अधिकारी पुन्हा असे वागणार नाही.

## 60. एफ.आय.आर. (प्राथमिक माहिती अहवाल) मध्ये कोणत्या गोष्टी यायलाच हव्यात?

एफआयआर ही तक्रार नोंद म्हणजे तुम्हाला माहिती असलेली वस्तुस्थिती किंवा पोलीसांना माहित असलेली परस्थितीजन्य गुन्हेविषयक माहिती याची सांगड एफ.आय. आर. मध्ये नमूद केलेली असते. तुम्हाला वस्तुस्थितीची प्रत्यक्ष माहिती असेल तर केव्हाही चांगले. पण तुम्ही प्रत्यक्ष तुमच्या डोळयांनी गुन्हा घडलेला पाहिला असण्याची आवश्यकता नाही. जे काही असल ते, तुम्ही केवळ बरोबरच माहिती द्यायला हवी. केव्हाही चढवून–वाढवून अतिशयोक्ती करून माहिती देऊ नका. किंवा कल्पनेने सांगू नका किंवा निष्कर्ष काढू नका. घटनेचे स्थान, तारीख किंवा वेळ सांगा. त्यामध्ये सामील असलेल्या प्रत्येक व्यक्तीची भूमिका काळजीपूर्वक सांगा. ते कुठे होते, ते काय करत होते, प्रत्येक व्यक्तिने काय काय केले हे क्रमाने सांगा. कशा प्रकारची दुखापत झाली आणि मालमत्तेची काय हानी झाली तेही सांगा. कोणत्या प्रकारच्या हत्यारांचा/अस्त्रांचा वापर

केला गेला याचा उल्लेख करायला विसरू नका. सर्व सत्य आणि परिस्थिती शक्य तितक्या लवकर नोंद करणे नेहमीच उत्तम. जर तक्रार नोंद करण्यास काही विलंब झाला तर या विलंबाचे कारण नोंदवायचे विसरू नका.

## 61. मी सांगितलेल्या सर्व गोष्टी पोलीसांनी जशाच्या तशा लिहिल्यात याची काय खात्री?

लक्षात ठेवा की एफ.आय.आर. हा तुम्हाला माहिती असलेल्या गोष्टीविषयी तुम्ही नोंदवलेली साक्ष असते. ती एखाद्या घटनेविषयीची पोलीसांची साक्ष नसते. पोलीसांचे काम केवळ तुम्ही सांगत असलेली माहिती जशीच्या तशी त्यात काहीही भर न घालता किंवा त्यातून काहीही कमी न करता तशीच्या तशी/तंतोतंत लिहून घेणे हे आहे. याची खात्री करून घेण्यासाठी कायद्यानुसार पोलीस अधिकाऱ्यांनी लिहिलेला एफआयआर तुम्हाला वाचून दाखवायला हवा. आणि लिहिलेल्या मजकुराशी तुम्ही सहमत असाल तरच त्यावर तुम्ही स्वाक्षरी करायला हवी. पोलीसांनी एफआयआरची सत्यप्रत तुम्हाला निःशुल्क द्यायला हवी. एफ.आय.आर. रजिस्टरमध्ये/नोंदवहीत एफ.आय.आर.ची नोंद होते आणि त्याची प्रत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आणि मॅजिस्ट्रेटकडे पाठवली जाते.

## 62. स्त्रियांचे एफ.आय.आर. (प्राथमिक माहिती अहवाल) नोंदवण्यासाठी काही विशेष पद्धती आहेत का?

हो. स्त्रियांविरुध्दच्या काही विशिष्ट गुन्ह्यांसंदर्भात अशा विशेष पद्धती आहेत. पोलीस स्टेशनमध्ये जाणे आणि एफआयआर नोंदवणे हे कोणत्याही स्त्रिसाठी सोपे नसते हे लक्षात घेऊन आता कायद्यानुसार बलात्कार, सामूहिक बलात्कार, लैंगिक छळ, विनयभंग, पाठलाग, किंवा ॲसिड हल्ला याची तक्रार घेऊन आली तर तिची तक्रार महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनीच दाखल करून घ्यायला हवी. पीडित स्त्रि जर मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या सक्षम नसेल तर तक्रार नोंदवण्याकरिता तिला पोलीस स्टेशनला जायचीही गरज नाही. त्याऐवजी पोलीसांनीच तिच्या घरी अथवा तिला योग्य वाटेल  अशा ठिकाणी जाऊन तिची तक्रार नोंदवून घ्यायची आहे. स्त्रिच्या गरजेनुसार पोलीसांनी विशेष शिक्षकांची किंवा समुपदेशकाची व्यवस्था करणेही आवश्यक आहे. अशा स्त्रिच्या जबाबाचे चित्रांकन करणेही आवश्यक आहे.

## 63. अशा प्रकारचा एफआयआर दाखल करून घ्यायला पोलीस अधिकाऱ्यांनी नकार दिला तर काय होते?

कुठल्याही प्रकारच्या लैंगिक गुन्ह्याची तक्रार घेऊन येणाऱ्या महिलेचा एफआयआर नोंदवण्यास पोलीस अधिकाऱ्याने नकार दिल्याचे सिद्ध झाल्यास त्याला सहा महिने ते दोन वर्ष कैद आणि दंड अशी शिक्षा सांगितलेली आहे.

## 64. लैंगिक अत्याचाराच्या बळी असलेल्या बालकांबाबत काय? या घटनांमध्ये पोलीसांनी काही विशेष पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे का?




हो. नक्कीच. लैंगिक अपराधा पासून बालकांना सरक्षण अधिनियम (POSCO) 2012 अंतर्गत बालकांचे लैंगिक शोषण आणि अत्याचार या संबंधित गुन्हे यांची नोंद होते. पीडित बालकांना विश्वासात घेऊन त्यांचे भयमुक्त वातावरणात तक्रार नोंद करणे, संबंधित गुन्हे तपास आणि चौकशी (POSCO) 2012 अंतर्गत होते. बालक लैंगिक अत्याचार संबंधित गुन्हा याची वर्दी/माहिती मिळताच संबंधित बालक गुन्हे साठी नियुक्त असणारे पोलीस कर्मचारी किंवा स्थानिक पोलीस ठाणे कर्मचारी यांनी पीडित बालकांची तक्रार नोंद त्याच्या/तिच्या घरी किंवा पीडित बालकांच्या सोयीच्या ठिकाणी घेण्याची




तरतूद कायदयात केली आहे. पीडित बालकाचे निवेदन नोंदवताना पोलीस कर्मचारी/अधिकारी गणवेशात नसावेत. बालकाला पोलीस ठाण्यात रात्री ठेवु नये. बालकाची तक्रार त्याच्या भाषेत नोंद केली पाहिजे. जर लागल्यास अनुवादकाची मदत घ्यावी. जर असे वाटले की बालकाला सुरक्षा किंवा काळजी घेण्याची गरज आहे. तर त्या बालकाला सुरक्षा निवारा किंवा रुग्णालयात पोलीसांनी दाखल करावे. रुग्णालयात तपासणीस गेल्यास सोबत त्या बालकाचे पालक किंवा बालकाचे कोणी विश्वासु असावेत. पीडित बालकाला रुग्णालयात नेण्यास आले तर पीडित बालक जर मुलगी असेल तर ही वैद्यकीय चाचणी महिला डाक्टरनेच करायला हवी. हे सगळ करत असताना पोलीसांना जी कारणे आहेत ती लिहुन ठेवावीत.

## 65. एफआयआर दाखल केल्यानंतर पुढे त्याचे काय होते?

एफआयआरमुळे पोलीसांच्या तपासाला सुरुवात होते. त्याचा एक भाग पोलीस पीडितांशी आणि साक्षीदारांशी बोलू शकतात, त्यांचे जबाब नोंदवू शकतात, मृत्यूसमयीचे जबाब नोंदवू शकतात, गुन्हाच्या ठिकाणाचा तपास करतात, पुरावे न्यायवैद्यक विभागाकडे (फॉरेंसिक) पाठवले जातात, आवश्यकता असल्यास मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले जातात, अनेकजणांना प्रश्न विचारले जातात आणि यातील प्रत्येक काम, प्रत्येक गोष्ट पुढच्या तपासाच्या दिशेने महत्त्वाची ठरते. तपास पूर्ण झाल्यावर संबंधित प्रभारी अधिकाऱ्याने त्याचे संपूर्ण रेकॉर्ड बनवणे आवश्यक असते. याला चलन किंवा आरोपपत्र असे म्हणतात.

## 66. चलन किंवा आरोपपत्र म्हणजे काय?

तपास पूर्ण झाल्यावर प्रभारी अधिकारी सर्व परस्थितीजन्य पुरावे लक्षात घेतो आणि गुन्हेगाराने गुन्हा केलेला आहे हे सिध्द करण्यासाठी आरोपपत्रात त्याची नोंद करतो. गुन्हे संबंधित सर्व पुरावे गोळा करता आले नाहीत तर आरोपीला न्यायालयात हजर करणे उपयोगी ठरणार नाही. सरकारी वकील आणि न्यायालय स्वतंत्रपणे आरोपपत्राची तपासणी करतील आणि गुन्हा घडला किंवा नाही हे स्वतंत्रपणे पहातील.

## 67. माझी गुन्हे संबंधित तक्रार बंद करू शकतात का आणि त्यासंदर्भात पुढील कार्यवाही करणे थांबू शकते का?

हो. पोलीसांनी स्वतःचा तपास पूर्ण केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की गुन्हा घडलेला आहे हे सिद्ध करणारे पुरावे/तथ्ये उपलब्ध नाहीत किंवा आरोपाच्या समर्थनार्थ पुरेसे पुरावे नाहीत किंवा गुन्हा घडलेला आहे हे मान्य करते पण तो कोणी केला याबद्दल माहिती मिळाली नसेल तर न्यायालयाला कारणे दिल्यानंतर ते ही केस बंद करू शकतात. पण त्यांनी तुम्हालाही त्यांच्या निर्णयाची माहिती द्यायलाच हवी. तेव्हा तुम्हाला न्यायालयासमोर केस बंद करण्याला विरोध करण्याची संधी असते.

## 68. माझ्या केस संदर्भातील प्रगतीविषयी मला नियमितपणे माहिती दिली जाईल का?

तुमच्या केसच्या प्रगतीविषयी पोलीस अधिकाऱ्याने तुम्हाला नियमितपणे माहिती देण्याविषयी कायद्यामध्ये काहीही सांगितलेले नाही. परंतु तक्रारदाराला त्याविषयी माहिती देत रहाणे ही एक चांगली प्रथा आहे. पण त्याचा तपासावर काही तडजोड/वाईट परिणाम होणार नाही हे पहायला हवे.

## 69. पोलीस माझ्या केस संदर्भात तपास करत नसतील किंवा अत्यंत संथपणे तपास करत असतील किंवा तपासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आधार असलेल्या घटकाची चौकशी करायला नकार देत असतील तर अशावेळी काय करायला हवे?

कायद्यातील एक महत्त्वाचे तत्त्व हे आहे की पोलीसतपासामध्ये कोणीही हस्तक्षेप/ढवळाढवळ करू शकत नाही. पोलीस जर तपास पुढे चालू ठेवायला नकार देत असतील किंवा अत्यंत संथपणे तपासकार्य चालू असेल किंवा तपासातील महत्त्वाच्या दुव्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असतील तर तुम्ही त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे किंवा जवळच्या मॅजिस्ट्रेटकडे त्याच्याविषयी तक्रार करू शकता. तो पोलीस अधिकाऱ्याला चौकशी/तपास करण्याचे आदेश देऊ शकतो किंवा तो तपासासंबंधीची कागदपत्रे मागवू शकतो. इथेही तुमच्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही प्रत्येक काम लिखित स्वरूपात केलेले असणे आणि संबंधित कागदपत्रांची पोचपावती तुमच्या जवळ असणे हे होय.




## 70. मला वाटेल तेव्हा मी पोलीस अधिकाऱ्याला बोलवू शकतो का?

हो आणि नाहीही. पोलीसांवर नेहमीच कामाचे जास्त ओझे असते. त्यांची संख्याही कमी आहे. त्यामुळे नागरिक त्यांना छोट्या–छोट्या तक्रारींसाठी किंवा अपुऱ्या माहितीच्या आधारे सतत बोलवू शकत नाहीत. पण तुम्ही जर संकटात असाल किंवा एखादा गुन्हा

घडलेला असेल किंवा गुन्हा घडत असेल, किंवा दंग्याची शक्यता असेल, काही लोक भांडत असतील आणि तेथील सुव्यवस्था बिघडणार असेल, किंवा पोलीसांना तुम्हाला काही गंभीर माहिती द्यायची असेल तर आपण पोलीसांना बोलवू शकता. पण पोलीसांच्या कामाशी संबंधित नसलेल्या गोष्टींसाठी तुम्ही पोलीसांना बोलवू शकत नाही. काही वेळा लोक गंमत म्हणून, काहीही घडलेले नसताना पोलीसांना फोन करतात. अशा चेष्टेसाठी त्यांना शिक्षाही होऊ शकते.

## 71. पोलीस अधिकारी न विचारता माझ्या घरात घुसू शकतात का? घराची तपासणी करू शकतात का? आणि घरातील सामान उचलून घेऊन जाऊ शकतात का?

काही अत्यंत मर्यादित, ठरावीक परिस्थितीतच त्यांना असे करता येते. पोलीस चौकशीसाठी तुमच्या घरी आले तर केवळ तुमच्या बोलावण्यावरूनच ते घरात प्रवेश करू शकतात. पण तुम्ही काहीतरी संशयास्पद लपवत आहात किंवा गुन्हेगाराला लपवताय किंवा तुमच्या घरी चोरीचा माल आहे किंवा बेकायदेशीर हत्यारे घरात लपवलेली आहेत यावर विश्वास ठेवण्यायोग्य आधारभूत माहिती पोलीसांकडे असेल तरच मॅजिस्ट्रेटकडून शोध वॉरंट घेऊन पोलीस तुमच्या घरात प्रवेश करू शकतात. पण जर संशयित, गुन्हेगार किंवा वस्तू विनाविलंब ताब्यात घ्यायच्या असतील आणि जप्ती आणली नाही तर त्या वस्तू हरवून जाण्याची, गुन्हेगार पळून जाण्याची शक्यता असेल तर पोलीस विना वॉरंट तुमच्या घरात प्रवेश करू शकतात.



## 72. याचा अर्थ पोलीस माझ्या घरात प्रवेश करू शकतात आणि कोणतेही सामान उचलून घेऊन जाऊ शकतात?

नाही. जेव्हा खरोखरची निकड असते तेव्हाच पोलीस विनावॉरंट तुमच्या घरात प्रवेश करू शकतात. उदा. संशयित पळून जाण्याची खरोखरच शक्यता असेल किंवा पुरावा नष्ट होण्याची शक्यता असेल. वॉरंटसह किंवा वॉरंटशिवाय कोणाच्याही घरात प्रवेश करण्यासाठीची एक पूर्ण प्रक्रिया असते. पोलीसांजवळ किमान दोन स्वतंत्र स्थानिक साक्षीदार असणे आवश्यक आहे. शोध/तपासणी घराच्या मालकांच्या उपस्थितीतच व्हायला हवी. मालकाला घरापासून दूर जायला सांगता येणार नाही. पोलीसांनी ते कोणत्या वस्तू घेताहेत त्याची यादी बनवणे आवश्यक असते. यादी बरोबर केली आहे ना हे तपासून त्यावर साक्षीदार, पोलीस आणि मालक यांनी सही करणे आवश्यक आहे. त्याची एक प्रत मालकाला द्यायला हवी. घरात पडदा/घुंगट घेतलेली महिला असेल तर तपासगटामध्ये महिला पोलीस अधिकारी असणे आवश्यक आहे आणि त्यांनी पूर्ण सभ्यता पाळूनच शोध घ्यायला हवा.

## 73. शोध वॉरंट म्हणजे काय?

लोकांची घरे आणि कार्यालये ही खाजगी ठिकाणे आहेत आणि खरोखरच योग्य कारण असल्याखेरीज कोणत्याही अधिकाऱ्याला प्रवेशासाठी आणि तपास करण्यासाठी ही ठिकाणे खुली नाहीत. त्यामुळे कायद्याची अशी अपेक्षा आहे की कोणीही अधिकारी जो या खाजगी ठिकाणी प्रवेश करू इच्छितो त्याने याचे स्पष्टीकरण द्यायला हवे की तो लोकांच्या या अधिकाराचे उल्लंघन का करू इच्छितो. म्हणूनच पोलीसांना प्रथम मॅजिस्ट्रेट पुढे जावे लागते आणि कारणांचे स्पष्टीकरण द्यावे लागते की त्या परिसरात सामान, कागदपत्र किंवा लोक लपून बसलेले आहेत जे गुन्हयाचा छडा लावण्याच्या कामी त्यांना उपयोगी पडणार आहेत, मदतकारक ठरणार आहेत. मॅजिस्ट्रेटला ही कारणे पटली आणि पोलीस काही अंधारात तीर मारत नाही आहेत याची त्यांना खात्री पटली तर ते त्यांना परवानगी देतात. हा अधिकार खूपच मर्यादित असतो आणि त्यामध्ये त्या ठिकाणी प्रवेश करायची परवानगी ज्याला देण्यात आलेली आहे त्या अधिकाऱ्याचे नाव आणि हुद्दा लिहिलेला असतो आणि त्यावर न्यायालयाची सही आणि शिक्का असतो.




## 74. मी रस्त्यावरून चाललेलो असेन तर कोणीही पोलीस अधिकारी मला थांबवून काहीही विचारू शकतात का?

नाही. आपल्या दैनंदिन कायदेशीर असणाऱ्या कामात गुंतलेल्या सर्वसामान्य माणसांच्या कामात पोलीसांनी हस्तक्षेप करू नये अशी अपेक्षा असते. परंतु त्यांना असे दिसले की एखादी व्यक्ति, एखाद्या ठिकाणी विशेषतः अंधार पडल्यावर रेंगाळते आहे तर पोलीस त्याला हटकू शकतात, नाव विचारू शकतात आणि तो काय करतोय हे विचारू शकतात आणि त्यांना काही संशयास्पद वाटले तर ते अटकही करू शकतात. पोलीस त्यांचा हा अधिकार/त्यांची ही ताकद नेहमीच संशयित व्यक्तिंना आणि सराईत गुन्हेगारांना वचक बसवण्यासाठी वापरतात. या अधिकाराच्या गैर/खूप जास्त वापरासंबंधी पोलीस सुधार समित्यांनी नेहमी चर्चा केलेली आहे आणि त्याचा निषेधही केलेला आहे.

## 75. पोलीस मला मिरवणुकीत भाग घेण्यापासून किंवा रस्त्यावरील बैठकीत भाग घेण्यापासून रोखू शकतात का?

शांततापूर्ण मिरवणुकीत भाग घेण्यापासून कोणीही तुम्हाला रोखू शकत नाही. परंतु मिरवणुकीसाठी स्थानिक पोलीसांची पूर्वपरवानगी घेतलेली असणे आवश्यक आहे. जर त्यांना वाटले की मिरवणुकीत काही गोंधळ होण्याची शक्यता आहे किंवा हिंसक वळण

लागायची शक्यता आहे तर पोलीस सरळ अशा मिरवणुकीला परवानगी नाकारतात. समजा परवानगी दिल्यानंतर मिरवणुकीत गोंधळ झाला, शांतता भंग झाला तर पोलीस ती रोखतात, लोकांना तिथून जाण्यास सांगतात आणि समजा जर लोकांनी ऐकले नाही तर त्यांच्यावर कारवाई करतात. एका बाजूला सर्वत्र शांतता–सुव्यवस्था राखणे ही पोलीसांची जबाबदारी आहे. दुसऱ्या बाजूला शांततापूर्ण मार्गांनी जनसभा, बैठका घेण्याचा लोकांचा मूलभूत हक्क त्यांना अंमलात आणता यावा यासाठी सहकार्य करणे हे देखील पोलीसांचे कर्तव्य आहे.

## 76. रस्त्यावर सभा किंवा मिरवणूक बंद पाडण्याकरिता पोलीस बळाचा वापर करू शकतात का?

हो, पण पोलीस जे काही करतील ते रास्त/समजदारीचे असायला हवे. ते काही लोकांना शिक्षा करण्यासाठी तिथे नसतात. सार्वजनिक सुरक्षितता राखली जावी आणि कायदा आणि सुव्यवस्था यांचा भंग होऊ नये, यासाठी पोलीस तिथे असतात. म्हणूनच नियम असा आहे की गर्दीला नियंत्रित करण्याचा शेवटचा उपाय म्हणूनच केवळ पोलिसांनी बळाचा वापर करायला हवा. बळाचा वापर करावा लागलाच तर तो कमीत कमी केला जावा, परिस्थितीच्या प्रमाणात असावा आणि लवकरात लवकर तो थांबवायला हवा. वास्तविक पहाता, कार्यकारी दंडाधिकारी किंवा पोलीसस्टेशनचा मुख्य अधिकारी, किंवा पोलीस स्टेशनच्या मुख्य अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत उपनिरीक्षकाच्या पदापेक्षा खालच्या पदावर नसलेला कोणताही अधिकारी या परिस्थितीत बळाचा वापर करण्याचा आदेश देऊ शकतो.



## 77. पोलीस वाटेल तेव्हा गोळीबार करू शकतात का?

नाही. अत्यंत दुर्मीळ अशा प्रसंगी जेव्हा नियंत्रणाची इतर सारी साधने पूर्णपणे वापरून झालेली असतात तेव्हाच अशा प्रकारच्या प्राणघातक बळाचा वापर करणे अपेक्षित असते. पुन्हा इथेही केवळ दंडाधिकारी किंवा मुख्य अधिकारीच अशा कृतीला मान्यता देऊ शकतो.

## 78. जर गर्दी हिंसक बनली आणि त्यांनी दगडफेक करायला सुरुवात केली किंवा मालमत्तेचा विध्वंस करायला सुरुवात केली तर पोलीस काय करू शकतात?

जीविताचे आणि सार्वजनिक/खाजगी मालमत्तेचे रक्षण करणे हे पोलीसांचे कर्तव्यच आहे. पण कारर्यवाही कशा प्रकारे करायची याची एक प्रक्रिया आहे – प्रथम गर्दीला पांगवण्यासंबंधी वारंवार – अनेकदा सूचना देणे, त्यासाठी गर्दीला वेळ देणे, त्यानंतर अंतिम ताकीद देऊन अश्रूधुराच्या नळकांडीचा किंवा सौम्य लाठीमाराचा वापर केला जातो. लाठीचा हल्ला डोक्यावर किंवा खांद्यावर करता कामा नये, तो कमरेच्या खालच्या भागातच केला जावा. जर पोलीस गोळी चालवणार असतील तर त्यांनी गोळीबार केला जाणार असल्याची अत्यंत स्पष्ट सूचना द्यायला हवी. बळाचा कमीत कमी वापर हा नियम इथेही आहे. गोळीचे लक्ष्य कमरेच्या खालच्या भागात असायला हवे. गोळीचे लक्ष्य गर्दीतल्या सर्वाधिक उग्र भागावर असायला हवे. गोळीचा उद्देश कोणाला ठार मारणे हा नसून गर्दीला पांगवणे हा असायला हवा. गर्दी पांगत आहे हे लक्षात येताच गोळी चालवणे थांबवायला हवे. जखमींना तातडीने रुग्णालयात न्यायला हवे आणि प्रत्येक अधिकाऱ्याने या संपूर्ण कार्यवाहीत आपली भूमिका काय राहिली याविषयीचा अहवाल तयार करून द्यायला हवा. संबंधित अहवाल संग्रहित ठेवला जाईल.



## 79. पोलीस मला अटक करून गुप्त ठिकाणी ठेऊ शकतात का? किंवा माझ्या अटकेची बातमी इतरांपासून गुप्त ठेवू शकतात का?

नाही. पोलीस अनेकदा असे करतात. पण ते कायद्याच्या विरूद्ध आहे. ज्या क्षणी पोलीस तुम्हाला त्यांच्या ताब्यात घेतात त्या क्षणापासून तुमच्या शारीरिक स्वास्थ्याची आणि तुमच्या अधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी पोलिसांवर असते.

तुम्हाला काही इजा पोहोचली किंवा तुमच्या अधिकाराचा मान राखला गेला नाही आणि कोणत्याही प्रकारे त्याचे उल्लंघन झाले तर त्यासाठी पोलीस जबाबदार असतात. हा महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा लक्षात ठेवायला हवा.

पुढची गोष्ट अशी आहे की पोलीस ठाण्यात येणाऱ्या सर्वांची नोंद पोलीस ठाण्याच्या सर्वसाधारण रोजनिशीत करणे हे पोलीसाचे कर्तव्य आहे. त्या नोंदीतून आपल्याला हे समजू शकते की चौकशीसाठी तुम्हाला पोलीस ठाण्यात किती वाजता आणलं गेलं आणि अटक केव्हा करण्यात आली हे तपास अधिकारी/कर्मचारी यांच्या रोजनिशीत हे नोंद केले जाईल पोलीस नियंत्रण कक्षाने देखील मागील 12 तासात कोण–कोणत्या व्यक्तीस अटक करण्यात आली त्याची अद्यायावत यादी प्रदर्शित करावयास हवी.

शेवटी, तुमच्या तपासणीच्या दरम्यान तुम्ही वकीलाची सेवा घेऊ शकता. याचाच अर्थ तुमच्या कस्टडीची जागा किमान तुमच्या मित्रांना किंवा नातेवाईकांना माहिती असायला हवी आणि तिथेपर्यंत त्यांना पोचता यायला हवं.

## 80. पोलीस अधिकारी मला पोलीस चौकीत ठेवून घेऊ शकतात का? की मला पाहिजे तेव्हा मी तिथून जाऊ शकतो?

संयुक्तिक/संधिध्द कारणासाठी औपचारिकरित्या तुम्हाला अटक केलेले नसेल तर तुम्हाला तुमच्या इच्छेविरुद्ध पोलीस चौकीत ठेवता येत नाही. पोलीसांनी चौकशीसाठीचा समन्स तुम्हाला पाठवलेला असेल तर त्यांना सहकार्य करणे आणि चौकशीमध्ये त्यांना मदत करणे हे तुमचे कर्तव्य आहे. परंतु ही चौकशी त्वरित, सक्षमपणे पूर्ण व्हायला हवी.

अनिश्चित काळासाठी पोलीस तुम्हाला पोलीस चौकीत बसवून ठेऊ शकत नाहीत. तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही तिथून निघून जाऊ शकता.

## 81. समजा पोलीस अधिकाऱ्यांनी मला जाऊ दिले नाही तर मी काय करू शकतो?

तुम्हाला जर औपचारिकरित्या अटक केलेली नसेल तर तुमच्या इच्छेविरुद्ध तुम्हाला एक क्षण देखील चौकीत, ताब्यात ठेवणे हा गंभीर गुन्हा आहे. याला बेकायदेशीर अटक म्हणतात. तुम्ही किंवा तुमचे कुटुंबिय, मित्र



संबंधित पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध त्याच्या वरिष्ठाकडे किंवा मॅजिस्ट्रेटकडेही तक्रार करू शकतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही त्वरित तुमच्या वकील, मित्र किंवा कुटुंबियांद्वारे उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात देखील जाऊ शकता आणि तुमच्या त्वरित सुटकेसाठी 'हेबियस कॉरपस' याचिका दाखल करू शकता.

## 82. हेबियस कॉरपस म्हणजे काय?

हा अत्यंत जुना उपाय आहे. ज्यामध्ये सत्ताधीश सामर्थ्यशाली किंवा आर्थिकदृष्टया बलशाली व्यक्ती पासून संरक्षण केले जाते. तसेच जे स्वतःचे संरक्षण स्वतः करायला असक्षम असतात त्यांच्यासाठी हा उपाय आहे.




याचा शब्दशः अर्थ 'व्यक्तीला सादर करा.' चुकीच्या कैदेविरुद्धचा हा सर्वात व्यवहार्य उपाय आहे. न्यायालयं – उच्च किंवा सर्वोच्च न्यायालय याची तातडीने दखल घेते आणि त्याचा तडाही लावते.

एखाद्या व्यक्तीच्या बेपत्ता होण्यासंबंधीचा अर्ज न्यायालयाला मिळणे याचाच अर्थ हा होतो की पीडित व्यक्तीला सर्वात शेवटचे पोलीस कैदेत बघण्यात आले होते. न्यायालय त्या व्यक्तीला त्वरित न्यायालयासमोर हजर करण्याचा आदेश देते आणि कैद समर्थनीय नसेल तर त्याला सोडून देते.

कैद बेकायदेशीर असेल तर न्यायालय पीडित व्यक्तीला नुकसान भरपाईही देते.

## 83. व्यक्तीला बेकायदेशीर अटक केलेली आहे आणि तिला कुठे ठेवले आहे याविषयी मला काही माहिती नसेल, तर तिला शोधण्याचा इतर काही मार्ग आहे का?

हो. आपण पोलीस ठाण्यात माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून संबंधित व्यक्तिच्या ठावठिकाण्याची माहिती विचारू शकता. ही माहिती व्यक्तिच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी संबंधित असल्याने पोलिसांनी 48 तासांच्या आत ही माहिती देणे बंधनकारक आहे.

## 84. योग्य कारणांशिवाय पोलीस अधिकारी मला अटक करू शकतात का?

नाही. योग्य कारणे आणि चांगला आधार असेल तरच पोलीस अटक करू शकतात. जसे की गैरकाम करताना एखाद्या व्यक्तीला रंगेहात पकडले गेले. पण अटकेसाठी 'योग्य कारण' असायलाच हवे. केवळ एखाद्याने एखाद्याचे नाव एफआयआरमध्ये घातले हे काही अटकेचं कारण होऊ शकत नाही. तुम्हाला अटक करण्यासाठी अधिक भक्कम पुराव्याची आवश्यकता असते.

दुसरे म्हणजे, एखाद्या व्यक्तीवर गुन्हा केल्याचा संशय असेल आणि त्या गुन्हयाची शिक्षा जर 7 वर्षांपर्यंत असेल तर त्यास अटक करू शकत नाहीत. पण जर असे पोलीसांना खात्री वाटली की संशयित व्यक्ती आणखी गुन्हे करेल किंवा पुराव्यांमध्ये फेरफार करेल तर त्याला पोलीस अटक करू शकतात.

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी त्या गुन्हेगार व्यक्तीस अटक करण्याचा किंवा न करण्याचा असा कोणताही निर्णय घेतला तरी त्या निर्णयामागील कारणे सक्षम पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी लिखित स्वरूपात नोंद केली पाहिजे.

## 85. मी गुन्हा केलेला आहे असा पोलिसांना संशय असेल तर ते माझ्या कुटुंबियांना देखील अटक करू शकतात का?

नाही. कधीच नाही. संबंध आहे म्हणून कोणी दोषी असू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती दोषी किंवा निर्दोषी/निरपराध असण्याचा निर्णय हा त्या व्यक्तीने स्वतःहून केलेले अपराध/कृती यानुसार घेतला गेला पाहिजे. हा निर्णय तो संशयित व्यक्तिचा निकटवर्ती आहे किंवा संबंधित आहे यावर आधारित घेता कामा नये. कोणत्याही व्यक्तीचे स्वातंत्र्य कोणतेही विशेष कायदेशीर कारण असल्याशिवाय हिरावून घेता येत नाही.

पोलीस कुटुंबियांना किंवा मित्रांना धमकी देऊ शकत नाहीत किंवा सौदयाचे साधन म्हणून त्यांना ताब्यात, कोठडीत ठेवू शकत नाहीत. अशा प्रकाराला बेकायदेशीर कैद किंवा अपहरण यासारखा गंभीर गुन्हा मानले जाते.

पोलीस जी केस सोडवण्याच्या प्रयत्नात आहेत ती कितीही कठीण असली तरी पोलीस कोणत्याही बेकायदेशीर पद्धतीचा वापर करून संशयिताला आत्मसमर्पण करायला किंवा गुन्हा कबूल करायला भाग पाडू शकत नाहीत. ज्यांच्याविरुद्ध त्यांनी गुन्हा केलेला आहे हे मानण्यासाठीचा योग्य आधार आहे, केवळ अशाच व्यक्तींना अटक केली जाते.



## 86. महिलांच्या अटकेसंदर्भात आणि त्यांच्या कस्टडीसंदर्भात काही विशेष नियम आहेत का?

हो. कोणत्याही महिलेला अतिविशेष कारण असल्याखेरीज सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी अटक करता येत नाही. त्यासाठीही मॅजिस्ट्रेटची लिखित, विशेष परवानगी घेणे आवश्यक आहे. अटकेसाठी योग्य कारणे आहेत हे मॅजिस्ट्रेटला पटले तरच तो लेखी अनुमती देईल.

अटकेच्या वेळी माहिला पोलीस अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे. अटक केलेल्या महिलेला पोलीस ठाण्यात स्वतंत्र खोलीत ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची तपासणी किंवा शारीरिक तपासणी महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे किंवा डॉक्टरद्वारेच व्हायला हवी.

महिलासंबंधीच्या सर्व प्रक्रियांची काळजीपूर्वक अंमलबजावणी करणे आणि त्याचे व्यवस्थित रेकॉर्ड ठेवणे–नोंद ठेवणे, हे पोलीस अधिकाऱ्याच्याच हिताचे आहे. कयाद्यानुसार पोलीस कस्टडीत असणाऱ्या स्त्रीने बलात्कार झाल्याची तक्रार केल्यास बलात्कार झालेला नाही हे सिद्ध करायची जबाबदारी पोलीस अधिकाऱ्याची आहे. जोवर तो हे सिद्ध करत नाही तोवर ही तक्रार खरी मानली जाईल.

## 87. मुलांसाठी काही खास / विशेष प्रक्रिया आहे का?



साधारण कायद्यांतर्गत 7 वर्षांच्या आतील मुले गुन्ह्यामध्ये आरोपी होऊ शकत नाहीत. त्यामुळे अर्थातच त्यांना पोलीस कोठडीत ठेवले जात नाही. तर 18 वर्षापर्यंतच्या मुलांची चौकशी, अटक, कस्टडी, सुटका, जामीन इ. प्रक्रिया बाल न्याय (मुलांची देखभाल आणि संरक्षण) कायदा 2002 नुसार होते.

प्रत्येक पोलीस ठाण्यात विशेष प्रशिक्षित अधिकारी असलेले बाल पोलीस युनिट असणे आवश्यक आहे. ज्यांना कधीही लॉक–अप मध्ये ठेवले जाता कामा नये अशा मुलांच्या देखभाल आणि कल्याण याची जबाबदारी त्यांच्यावर असते. याशिवाय जामीन दिल्यावर आणि खात्री दिल्यावर मुलाला ताबडतोब आई–वडिलांच्या ताब्यात सोपवले पाहिजे.

जर पालक उपलब्ध नसतील आणि मूल वाईट लोकांच्या संगतीत सापडण्याचा धोका असेल तर मुलाला बाल न्यायालयात सादर करेपर्यंत स्थानिक निरीक्षणगृहात पाठवणे आवश्यक आहे. मुलांसंदर्भात कायद्याचे मुख्य तत्त्व हे सर्व प्रक्रियांमध्ये बालस्नेही दृष्टिकोन असणे आणि “बालकाचे सर्वोत्तम हित हे त्यांचे पुनर्वसन” नजरेसमोर ठेवून कायद्याचे विरूद्ध जात असलेल्या बालकाना मदत करणे हे कायद्याचे उद्दिष्ट आहे.

## 88. पोलीसांनी मला अटक केली तर त्यांना हवा तितका वेळ ते मला अटकेत ठेऊ शकतात का?

अजिबात नाही. पोलीस ठाण्यात पोलीस तुम्हाला जास्तीत जास्त 24 तासच ठेवू शकतात. हा किमान वेळ आहे. पोलीसांनी त्यांच्या कस्टडीत असणाऱ्या कुणालाही त्यांच्या अटकेच्या समर्थनार्थ लागणाऱ्या सर्व आवश्यक कागदपत्रांसह मॅजिस्ट्रेटसमोर 24 तासांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

## 89. लोकांना शुक्रवारी संध्याकाळी अटक केली जाते आणि सोमवारपर्यंत कोठडीत ठेवले जाते. असं कसं?

अशा प्रकारची बेकायदेशीर प्रथा चालू ठेवण्यासाठी आठवड्याच्या शेवटी कोणी मॅजिस्ट्रेट उपलब्ध नसतात हे कारण पोलीस पुढे करतात. पण प्रत्यक्षात एक मॅजिस्ट्रेट आठवड्याचे सातही दिवस 24 तास कामावर उपलब्ध असतो. कोठडीत असणाऱ्या व्यक्तीची 24 तासांची मुदत जर न्यायालयाच्या नियमित तासांच्या नंतर संपत असेल तर त्याला मॅजिस्ट्रेटच्या घरी सादर केले जाऊ शकते. मॅजिस्ट्रेट संशयिताला पहाण्यास नकार देऊ शकत नाही.



## 90. मला कोठे ठेवण्यात आलेले आहे हे एखाद्याला कसे समजेल?

या व्यवस्थेत तुम्ही हरवून जाऊ नये यासाठीचे अनेक सुरक्षा उपाय कायद्यामध्ये आहेत. ज्याक्षणी पोलीस तुम्हाला अटक करतील त्याक्षणी त्यांनी अनेक गोष्टी करायलाच हव्यात. त्यांनी ज्याला 'मेमो ऑफ ॲरेस्ट' म्हणजे 'अटकेचे पत्र' तयार करून स्थानिक मॅजिस्ट्रेटकडे पाठवायलाच हवे. तुम्हाला तात्काळ वकील मिळेल (वैयक्तिक किंवा मोफत कायदा सहाय्यता व्यवस्थेकडून) हे पोलीसांनी पहायला हवे. त्यांनी तुमच्या कुटुंबातील सदस्याला किंवा मित्राला कळवायला हवे. पोलीसांनी आपल्या बळाचा गैरवापर करण्याची शक्यता कमीत कमी करण्यासाठी या साऱ्या गोष्टी कायद्यात दिलेल्या आहेत. पोलीसांनी हे नियम पाळले नाहीत तर त्यांनी न्यायालयाला उत्तर देणे आवश्यक असते. याखेरीज जिल्हा पोलीस–नियंत्रण कक्षाच्या बाहेरच्या सूचना–फलकावर पोलीसांनी अटक केलेल्या सर्व व्यक्तींची नावे आणि त्यांचे पत्ते आणि अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे आणि हुद्दे लिहायला हवेत. प्रत्येक राज्यातील पोलीस–मुख्यालयांच्या नियंत्रण–कक्षाने अटक झालेल्या व्यक्तींची नावे आणि त्यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप यांची माहिती जनतेकरिता उपलब्ध करून द्यायलाच हवी.

## 91. माझ्यासाठी 'अटकेचे पत्र' 'मेमो ऑफ ॲरेस्ट' चा काय उपयोग आहे?

बेकायदेशीर अटकेविरुद्धचा तो सुरक्षा उपाय आहे. त्यावर तुमचे नाव, अटकेची वेळ, तारीख आणि जागा, अटकेची कारणे आणि संशयित गुन्हा यांचा उल्लेख असायला हवा. त्यावर पोलिसांची, दोन साक्षीदारांची आणि तुमची स्वाक्षरी/सही असायला हवी. हयामुळे ही खात्री होते की ज्या नोंदी केल्या आहेत त्या वस्तुस्थितींच्या सत्यपूर्ण वृतांत आहे. ती प्रत मॅजिस्ट्रेटला दिली जाते आणि जेंव्हा मॅजिस्ट्रेट तुम्हाला पहिल्यांदा भेटतो तेंव्हा तो त्यामध्ये केलेल्या नोंदी बरोबर असल्याची पुर्नतपासणी करतो. पोलिसांना एक 'तपासणी पत्र'/'निरीक्षण पत्र' ही तयार करावे लागते.

## 92. 'निरीक्षण पत्र' – 'इन्स्पेक्शन मेमो' म्हणजे काय?

तुम्हाला कस्टडीत/कोठडीत नेण्याच्या वेळच्या शारीरिक स्थितीचे संक्षिप्त वर्णन म्हणजे 'निरीक्षण पत्र'. तुमच्या सर्वसाधारण शारीरिक स्थितीच्या नोंदी करणे आणि मोठ्या आणि छोटया दुखापती, जखमांच्या नोंदी करणेही अपेक्षित आहे. यावर तुमची आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची सही असायलाच हवी. या पत्रातील आणि अटक पत्रातील फरक हा आहे की यासाठी तुम्ही विनंती करायला हवी अन्यथा हे पत्र तयार केले जात नाही. कस्टडीमध्ये तुम्हाला मारहाण वा छळ झालेला नाही हे निश्चित करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. पण तुमची तपासणी कोण करेल हे निश्चित नाही. अटक केलेल्या अधिकाऱ्यांनीच जर तुमची तपासणी केली तर अशा निरीक्षण पत्रांने तुम्हाला काही संरक्षण मिळण्याची शक्यता नाही. मॅजिस्ट्रेटसमोरच्या प्रथम सादरीकरणाच्या वेळी इतर कागदपत्रांसोबत मान्यतापात्र डॉक्टरचे सर्टिफिकेट सादर करणेही आवश्यक असते. त्यामुळे तुम्हाला मॅजिस्ट्रेटसमोर, पहिल्यांदा सादर करण्यापूर्वी डॉक्टरने तुमची तपासणी करून तुमच्या शारीरिक स्थितीविषयीचे विवरण तयार करणे आवश्यक आहे.

## 93. मला या सर्व गोष्टीची माहिती कशी मिळेल?

कायद्यानुसार अटकेच्या वेळी पोलिसांनी तुम्हाला तुमच्या सर्व अधिकारांविषयी सांगणे, माहिती देणे अपेक्षित आहे. याशिवाय वर सांगितलेली सर्व मार्गदर्शकतत्त्वे

ज्याला काही वेळा डी.के बसू मार्गदर्शकतत्त्वे म्हणून ओळखले जाते ती सर्व पोलीस ठाण्यांमध्ये आणि चौक्यांमध्ये सूचना फलकावर प्रदर्शित करायला हवीत.

## 94. पोलीस अधिकारी कस्टडीमध्ये मला मारहाण करू शकतो का?

नाही. कस्टडीमध्ये असताना पोलीस अधिकारी तुम्हाला मारू शकत नाही, थप्पड लगावू शकत नाही आणि धमकीही देऊ शकत नाही. हे कायद्याच्या विरूद्ध आहे आणि त्याबद्दल पोलीस अधिकाऱ्याला शिक्षा होऊ शकते.

## 95. पोलीस अधिकारी मला गुन्हा कबूल करायची जबरदस्ती करू शकतो का?

नाही. तुम्हाला प्रश्न विचारायचा पोलीस अधिकाऱ्यांना अधिकार आहे पण ज्याविषयी तुम्हाला काही माहिती नाही त्याविषयी काही म्हणायची जबरदस्ती तो करू शकत नाही किंवा जी गोष्ट तुम्हाला सांगायची नाही त्याविषयी, किंवा जो गुन्हा तुम्ही केलेलाच नाही तो कबूल करण्याविषयी पोलीस अधिकारी तुमच्यावर जबरदस्ती करू शकत नाहीत. पोलीस अधिकाऱ्यासमोर दिलेली कबुली न्यायालयात कधीही ग्राह्य धरली जात नाही.



## 96. इतकी सारी बंधने असताना पोलीस दोषी व्यक्तीला अटक करण्याचे त्याचे काम करू शकतात का?

सर्वात पहिली गोष्ट म्हणजे कोण दोषी आहे किंवा कोण दोषी नाही हे ठरवण्याचे काम पोलीसांचे नाही. पोलीसांचे काम फक्त संशयिताला आणि आरोपींना पकडणे हे आहे. पण जणूकाही तो माणूस दोषीच आहे आणि त्याला शिक्षा देण्याचा त्यांना अधिकार असल्याप्रमाणे पोलीस वागू शकत नाहीत. ते न्यायालयाचे काम आहे. कस्टडीमध्ये असणाऱ्या लोकांना चुकीच्या आरोपांपासून आणि दुर्वर्तनापासून, गैरवागणुकीपासून सर्वप्रकारचे संरक्षण मिळायला हवे आणि म्हणूनच ही 'बंधने' घातलेली आहेत. खरे तर याला बंधने म्हणणे बरोबरच नाही. न्यायालयासमोर प्रत्येकाला निःपक्ष सुनावणीची संधी मिळावी यासाठी बनवलेल्या या प्रक्रिया आहेत.

## 97. आरोपी व्यक्तीसाठी हे अधिकार जरा जास्तच आहेत असे वाटत नाही का? पीडित व्यक्तीच्या अधिकाराचे काय?

अनेक लोकांना असे वाटते की पीडित व्यक्तीकडे कोणीही लक्ष देत नाही. पण खरेतर राज्याची संपूर्ण शक्ती पीडित व्यक्तीच्या मागे उभी असते. राज्य पीडित व्यक्तीच्या वतीने गुन्हेगाराचा शोध घेते. न्यायालयात केस सादर करण्यासाठी राज्य पीडित व्यक्तीच्यावतीने फिर्यादीची नियुक्ती करते. राज्य पीडित व्यक्तीच्या वतीने दोषीला/गुन्हेगाराला शिक्षा देते. परंतु आरोपी एकटा असतो तो कदाचित पूर्ण निर्दोष असू शकतो. म्हणूनच जो/जी व्यक्ती (आरोपी) स्वतःचा बचाव स्वतःच करण्यास पात्र नसते अशा गुन्हेगार व्यक्ती विरुद्ध संतुलीत व्यवस्थापन होण्यासाठी राज्याचा न्याय आणि पोलीस यंत्रणेस कायदयाने काही सुरक्षा उपाय बनवलेले आहेत. आणि जे कायदेशीर मदत घ्यायला असमर्थ आहेत त्यांच्याकरिता निःशुल्क/मोफत कायदा साहाय्यता केंद्रासारख्या सुविधा दिलेल्या आहेत.

## 98. पोलीसांकडून मला जामीन मिळू शकतो का?

ते तुमच्या गुन्ह्याच्या स्वरूपावर अवलंबून असते. तुम्हाला जर जामीनपात्र गुन्ह्यासाठी अटक झालेली असेल तर तुम्हाला पोलिसांकडून जामीन मिळू शकतो. जर तुम्हाला अ–जामीनपात्र गुन्ह्यासाठी अटक करण्यात आलेली असेल तर पोलीस तुम्हाला जामिनावर सोडू शकत नाही. असे फारच थोडे गुन्हे आहेत ज्यासाठी पोलीसस्टेशनचा अधिकारी तुम्हाला जामिनावर सोडू शकेल.

## 99. 'जामीनपात्र' गुन्हा कोणता आणि 'अ–जामीनपात्र' गुन्हा कोणता हे माहिती असणे महत्त्वाचे आहे का?

हो. जामीनपात्र गुन्हे हे कमी गंभीर गुन्हे असतात. ज्यामध्ये जामीन हा हक्क असतो. अशा घटनांमध्ये तुम्हाला पोलिसांकडून ताबडतोब जामीन मिळायलाच हवा. अ–जामीनपात्र गुन्हे हे गंभीर स्वरूपाचे गुन्हे असतात. जिथे जामीन मिळणे अवघड असते. अशा गुन्ह्यांमध्ये केवळ न्यायालयच जामीन मंजूर करू शकते. काही थोड्याच अपवादात्मक स्थितीमध्ये पोलीसही जामीन मंजूर करू शकतात.

## 100. माझ्यावर जर एखाद्या अ–जामीनपात्र गुन्ह्याचा आरोप असेल तर मला कधीच जामीन मिळणार नाही का?

नाही. असेच असेल असे नाही. तुम्हाला अ–जामीनपात्र गुन्ह्यांसाठीही जामीन मिळू शकतो. जामीन मिळावा यासाठी तुम्हाला न्यायालयाकडे तसा अर्ज करावा लागतो. न्यायालय गुन्ह्याच्या गंभीरतेचा विचार करेल. न्यायालय हे पाहील की तुम्हाला जामिनावर सोडले तर तुम्ही फरार तर होणार नाही, तुम्ही साक्षीदारांना धमकावणार तर नाही किंवा पुराव्यामध्ये काही फेरफार तर नाही करणार? यापैकी कोणतीही कृती तुम्ही करणार नाही असे जर न्यायालयाला वाटले तर न्यायालय तुम्हाला जामीन देईल.

## 101. याचा अर्थ असा आहे का की मी आता मुक्त झालो?


नाही. दरम्यान तुम्हाला न्यायालयीन चौकशीला सामोरे जावेच लागेल. त्यानंतर तुम्ही दोषी आहात की निर्दोष आहात याचा निर्णय न्यायालय देईल.



# पोलीस अधिकाऱ्यांचे पद–चिन्ह



पोलीस
महानिर्देशक
(डी.जी.पी.)



पोलीस
महानिरीक्षक
(आय.जी.पी.)



पोलीस
उपमहानिरीक्षक
(डी.आय.जी.)



वरिष्ठ पोलीस
अधीक्षक
(एस.एस.पी.)




पोलीस अधीक्षक
(एस.पी.)



अतिरिक्त
पोलीस अधीक्षक
(ॲडिशनल एस.पी.)


# पोलीस अधिकाऱ्यांचे पद–चिन्ह



सहायक/
उपपोलीस अधीक्षक
(ए.एस.पी/
डी.वाय.एस.पी.)



निरीक्षक
(आय.पी.)



उपनिरीक्षक
(एस.आय.)



सहाय्यक उपनिरीक्षक
(ए.एस.आय.)



मुख्य पोलीस हवालदार
(एच.सी.)

# सी.एच.आर.आयचे कार्यक्रम

मानव अधिकार, सच्ची लोकशाही आणि विकास यांना लोकांच्या जीवनाची वास्तविकता बनवण्याकरिता राष्ट्रकुल आणि त्यांच्या सदस्य देशांमध्ये उत्तरदायित्व आणि सहभागितायांसाठी उच्च मापदंड आणि सक्रिय व्यवस्था असण्याची गरज आहे, या धारणेवर या विश्वासावर सी.एच.आर.आयचे काम आधारित आहे. त्यासाठी व्यापक मानव अधिकार समर्थन कार्यक्रमाबरोबरच सी.एच.आर.आय. माहितीपर्यंतची पोहोच आणि न्यायापर्यंतची पोहोच वाढावी यासाठी प्रयत्नशील आहे. संशोधन, प्रकाशने, कार्यशाळा, माहितीचे प्रसारण आणि समर्थन यांद्वारे हे काम केले जाते.

## मानव अधिकारासाठी समर्थन:

सी.एच.आर.आय. अधिकृत राष्ट्रकुल मंडळाला आणि सदस्य सरकारांना नियमितपणे माहिती पुरवते. सत्यशोधन मोहिमांचे आयोजन करते. 1995 पासून नायजेरिया, झांबिया, फिजी आयलंड आणि सिएरा लियो इ. विकाणी मध्ये सीएचआरआयने आपली सत्यशोधन समिती पाठवलेली आहे. सीएचआरआय राष्ट्रकुल मानव अधिकार नेटवर्कच्या समन्वयाचे कामही करते. मानव अधिकाराच्या प्रसारासाठी, समर्थनासाठी वेगवेगळ्या गटांना एकत्र आणून त्यांची ताकद वाढवण्याचे काम ते करतात. लोकांमध्ये मानव अधिकांराबद्दलची सजगता कायम रहावी यासाठी सीएचआरआयचा माध्यम गट कार्यरत आहे.

## माहितीपर्यंतची पोहोच:

नागरी समाज आणि सरकार यांनी कृती करावी यासाठी त्यांना प्रेरित करायचे काम सीएचआरआय करते. सशक्त कायद्याच्या समर्थनासाठी तांत्रिक तज्ज्ञांचे केंद्र म्हणून ते कार्य करते आणि चांगल्या प्रथांच्या अंमलबजावणीसाठी सहयोगींना मदत करते. सरकारच्या आणि नागरी समाजाच्या क्षमताविकसनासाठी, त्याचप्रमाणे धोरणकर्त्यांबरोबर समर्थनासाठी स्थानिक गट आणि अधिकाऱ्यांबरोबर सी.एच.आर.आय. संयुक्तरित्या काम करते. सी.एच.आर.आय. दक्षिण आशियामध्ये सक्रिय आहे. अलीकडे भारतामध्ये राष्ट्रीय कायद्यासाठीच्या यशस्वी मोहिमेला त्यांनी पाठिंबा दिला. अफ्रिकेमध्ये कायद्याच्या प्रक्रियेत सहकार्य तर प्रशांत क्षेत्रात कायद्यांपर्यंत पोहोच वाढावी यासाठी प्रादेशिक आणि राष्ट्रीय संघटनांच्या बरोबर काम करत आहे.

## न्यायापर्यंत पोहोच:

**पोलिससुधार** – अनेक देशांमध्ये पोलिसांना नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षणकर्ते म्हणून बघण्याऐवजी राज्याचे जुलमी तंत्र म्हणून पाहिले जाते. परिणामतः अधिकारांचे मोठया प्रमाणात उल्लंघन होते आणि नागरिकांना न्यायापासून वंचित रहायला लागते. सीएचआरआय व्यवस्थात्मक सुधाराला प्रोत्साहन देते त्यामुळे तत्कालिन शासनाच्या हातातले बाहुले बनवण्याऐवजी कायद्याच्या नियमानुसार काम करणारी यंत्रणा म्हणून पोलिस काम करू शकतील. भारतामध्ये सीएचआरआयच्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे पोलिससुधारणेसाठी लोकांचा पाठिंबा संघटित करणे हे आहे. पूर्व अफ्रिका आणि घानामध्ये सीएचआरआय पोलिसांच्या उत्तरदायित्वाचे मुद्दे आणि राजकीय हस्तक्षेप यांची तपासणी करत आहे.

**तुरुंगसुधार** – सी.एच.आर.आयचे काम हे पारंपरिकरित्या बंद कारागृह व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणणे आणि तिथल्या कु–प्रथा उजेडात आणणे हे आहे. कायदा व्यवस्थेचे अपयश उजेडात आणण्यावर त्यांचा मुख्य भर आहे. या अपयशाचा परिणाम हा तुरुंगाच्या क्षमतेपेक्षा खुप अधिक संख्येने कैद्यांना तुरुंगात ठेवणे, खटल्यापूर्वीच अन्याय्य/अयोग्य पद्धतींनी दीर्घकाळासाठीची कैद–तुरुंगवास असा होतो. या समस्या सोडविण्यासाठी सीएचआरआय हस्तक्षेप करते. संपूर्णतः अपयशी ठरलेल्या कारागृह–देखरेख व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे हे सीएचआरआयचे आणखीन एक उद्दिष्ट आहे. आम्हाला असा विश्वास आहे की या क्षेत्रांकडे लक्ष दिल्यामुळे तुरुंगांच्या प्रशासनामध्ये सुधारणा घडून येईल त्याचप्रमाणे सर्वसाधारण न्याय प्रशासनावर ही त्याचा आमूलाग्र असा परिणाम होईल.

# मोठ्यांसाठी शिकण्यायोग्य बाल पुस्तिका

Friedrich Naumann STIFTUNG FÜR DIE FREIHEIT

युएसओ हाऊस, 6, स्पेशल इन्स्टिट्यूशनल एरिया, नवी दिल्ली 110067, भारत
दूरध्वनी : +91–11–26862064, किंवा : +91–11–26863846, फॅक्स : +91–11–26862042
www.southasia.fnst.org/www.stiftung-freiheit.org

**डेलिगेशन ऑव्ह् युरोपियन युनियन टू इंडिया**

5/5, शांतिनिकेतन, नवी दिल्ली – 110021
दूरध्वनी : +91–11–66781919
फॅक्स : +91–11–66781955
वेबसाईटः http://www.eeas.europa.eu/delegations/india/index_en.htm

या अहवालातील आशयाची संपूर्ण जबाबदारी सीएचआरआयची असून युरोपियन युनियनची भूमिका म्हणून कोणत्याही परिस्थितीत ही ग्राह्य धरता येणार नाही.

**कॉमनवेल्थ ह्यूमन राईट्स इनिशिएटिव्ह**

55–अ, सिध्दार्थ चेंबर 1, कालु सराई, 3रा मजला, नवी दिल्ली–110016
दूरध्वनीः +91–11–4318–0200
फॅक्सः +91–11–2686–4688
info@humanrightsinitiative.org, www.humanrightsinitiative.org

Printed at : Printworld # 9810185402